❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : ३२४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



सैनिकी शाळांतील प्रवेश गुणवत्तेच्या आधारेच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील सैनिकी शाळांमध्ये गुणवत्ताधारित प्रवेश प्रक्रिया अधिक सक्षम करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन देण्यात येईल. शाळांच्या कामगिरीनुसार जिथे कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे तिथे प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. सैनिकी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करण्यावर या संदर्भातील धोरणात भर देण्यात यावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सैनिकी शाळा मूल्यांकन व सक्षमीकरण आराखडा तसेच सैनिकी शाळा सुधारीकरण धोरणांतर्गत गठित समितीच्या अहवालासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती, तेव्हा ते बोलत होते. बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मंगेश जोशी, यशदा, पुणे येथील उपमहासंचालक हेमंत वसेकर, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नागपूरचे शैलेश जोगळेकर, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथील डॉ. अजय फुंदे तसेच समितीचे सदस्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, समितीने सादर केलेल्या अहवालातील बहुतांश शिफारशी योग्य असून, संबंधित विभागांनी त्यावर आवश्यक कार्यवाही करावी. यासाठी अन्य विभागांशी समन्वय साधून निर्णय घ्यावेत. सैनिकी शाळांच्या कामकाजाचा वर्षातून एकदा आढावा घेऊन शिफारशींच्या अंमलबजावणीची प्रगती तपासावी. 'अ' वर्गातील सैनिकी शाळांना त्यांच्या कामगिरीबाबत प्रोत्साहन देवून 'ब' श्रेणीतील शाळांना 'अ' वर्गात येण्यासाठी प्रोत्साहन देणे, 'क' आणि 'ड' श्रेणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.आवश्यक ती कठोर कार्यवाही करावी असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सैनिकी शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्ता उंचावण्याबरोबरच पायाभूत सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सैनिकी प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी हा आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी तसेच संरक्षण दलांमध्ये अधिकारी म्हणून अधिकाधिक विद्यार्थी दाखल व्हावेत, या उद्देशाने सैनिकी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करण्यावर या धोरणात भर देण्यात यावा असे निर्देशही त्यांनी दिले.

शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, राज्य सैनिकी शाळा मूल्यांकन व सक्षमीकरण आराखडा तसेच सैनिकी शाळा सुधारीकरण समितीने राज्यातील प्रत्येक शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन शैक्षणिक, प्रशासकीय आणि सैनिकी प्रशिक्षणाच्या अनुषंगाने सखोल पाहणी केली आहे. त्यानंतर अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्यात आला आहे. शासनाने या संस्थांना सुमारे ३० एकर जमीन आणि विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा प्रभावी वापर करून शाळांच्या कामकाजातील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अधिकाधिक विद्यार्थ्यांना शुल्कसहाय्य देण्याबाबत विचार करावा. सैनिकी शिक्षणाची आवड आणि क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी राज्य अथवा जिल्हास्तरावरील प्रवेश परीक्षा अधिक काटेकोर व गुणवत्ताधारित करावी. तसेच राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि अन्य संरक्षण अकादमींमधील प्रवेशासाठी इंग्रजी माध्यमाचे महत्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करण्यासाठी इंग्रजी माध्यमातील शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

भरतीपूर्व प्रशिक्षण देणारी शासकीय संस्था सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून, या संस्थेत विद्यार्थिनींची पहिली तुकडीही सध्या प्रशिक्षण घेत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील युवक-युवतींना संरक्षण दलांमध्ये अधिकारी म्हणून संधी मिळविण्यासाठी अधिक सक्षम करता येईल, असेही शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी नमूद केले.

राज्यातील ३८ सैनिकी शाळांचे पाच श्रेणींमध्ये वर्गीकरण

यशदा पुणे येथील उपमहासंचालक हेमंत वसेकर यांनी या विषयाचे सादरीकरण केले.यामध्ये सैनिकी शाळा सुधारित धोरणांतर्गत गठित समितीने राज्यातील ३८ सैनिकी शाळांचे शैक्षणिक, प्रशासकीय आणि सैनिकी प्रशिक्षणातील कामगिरीच्या आधारे वर्गीकरण करणे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन, अनुदान आणि सौरऊर्जा प्रकल्पांसारख्या सुविधा उपलब्ध करून देणे, मध्यम कामगिरी करणाऱ्या शाळांना सुधारणा करण्यासाठी संधी देणे, तर सातत्याने कमी कामगिरी करणाऱ्या शाळांबाबत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करणे, अशा महत्वपूर्ण शिफारशी अहवालात करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील (एनडीए) प्रवेशाचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यस्तरीय सनियंत्रण समिती आणि सैनिकी शाळा नियामक मंडळ स्थापन करणे, शाळांच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवणे, गुणवत्ता निकष निश्चित करणे आणि सुधारणांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे याबाबत सविस्तर माहिती दिली.

थोडक्यात...

मेरिटवर शिवसेना उद्धवजींचीच राहील

बारामती : दैनिक संध्या

सर्वोच्च न्यायालयातील शिवसेनेच्या पक्ष आणि चिन्हाची सुनावणी अंतिम टप्प्यात आली असताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठे विधान केले आहे. "मी कोणतीही भविष्यवाणी करत नाही; मात्र गुणवत्तेच्या (मेरिट) आधारावर शिवसेना हा पक्ष कालही उद्धव ठाकरे यांचाच होता, आजही आहे आणि उद्याही त्यांचाच राहील," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. शुक्रवारी (20 नोव्हेंबर 2026) बारामती दौऱ्यावर असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बारामती विमानतळाच्या विकासासाठी मंजूर झालेला 64 कोटी रुपयांचा निधी, इंदापूरमधील मतदार यादीतून नावे वगळल्याची कथित ऑडिओ-व्हिडिओ क्लिप, दुष्काळी परिस्थिती आणि शरद पवार यांच्या बारामती दौऱ्याबाबत सविस्तर माहिती दिली. राज्य सरकारने बारामती विमानतळाच्या सुधारणा आणि विकासासाठी 64 कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल सुप्रिया सुळे यांनी या निर्णयाचे स्वागत केले. मात्र, यावेळी अजित पवार यांच्या विमान अपघाताची आठवण काढताना त्या भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. "सरकारच्या या निर्णयाचे मी स्वागत करते, 'देर आए दुरुस्त आए'. पण हा 64 कोटी रुपयांचा निधी जर दादांच्या विमान अपघातापूर्वी मंजूर झाला असता, तर कदाचित तो अपघात टळला असता आणि दादा आज आपल्यात असते," अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली.

धरणे आंदोलन

पुणे : दैनिक संध्या

स्टेशन मास्टर्सच्या प्रलंबित मागण्यांकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ऑल इंडिया स्टेशन मास्टर्स असोसिएशनच्या पुणे मंडळाने शुक्रवारी, २० नोव्हेंबरला आंदोलन केले. पुणे रेल्वे विभागीय व्यवस्थापक कार्यालयासमोर शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्यात आले. रिक्त पदे तातडीने भरणे, अतिरिक्त कामाचे तास कमी करणे, अन्यायकारक चार्जशीट मागे घेणे आणि विनाकारण होणाऱ्या बदल्या थांबवणे, अशा मागण्या संघटनेने केल्या. आंदोलनात ऑल इंडिया स्टेशन मास्टर्स असोसिएशनचे राष्ट्रीय महामंत्री धनंजय चंद्रात्रे, अध्यक्ष पुरुषोत्तम सिंग आणि पुणे मंडळाचे सचिव दिनेश कांबळे सहभागी झाले. संघटनेच्या म्हणण्यानुसार, पुणे मंडळातील स्टेशन मास्टर्स आणि पॉइंट्समनची अनेक पदे गेल्या काही वर्षांपासून रिक्त आहेत. त्यामुळे सध्या काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत आहे. एका कर्मचाऱ्याला अनेक जणांचे काम करावे लागत आहे. कर्मचाऱ्यांना अनेकदा १२ तासांपेक्षा जास्त वेळ काम करावे लागते. याचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे संघटनेने सांगितले. रिक्त पदे भरून मनुष्यबळाची कमतरता दूर करण्याची मागणी करण्यात आली. किरकोळ चुकांसाठी स्टेशन मास्टर्सना चार्जशीट देणे आणि ट्रेन उशिरा धावल्यास एकतर्फी कारवाई करणे, यावर संघटनेने आक्षेप घेतला.

धाराशिवच्या शेतकऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

■ धाराशिव (दै. संध्या)

■ रखडलेला 227 कोटींचा पीक विमा वाटप करण्याचे आदेश, खरीप 2020 हंगामातील विम्याचा प्रश्न मार्गी



धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक आणि ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला असून, खरीप 2020 हंगामातील रखडलेला 227 कोटी रुपयांचा पीक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार असून, प्रत्येक शेतकऱ्याला साधारणतः 9 हजार रुपयांची मदत मिळणार आहे. विशेष म्हणजे या रकमेचे वितरण येत्या आठ ते दहा दिवसांत सुरू होणार आहे.

या संदर्भात माहिती देताना आमदार ज्ञानराज चौगुले म्हणाले की, आज सर्वोच्च न्यायालयात धाराशिव जिल्ह्याच्या पीक विम्याच्या संदर्भात चालू असलेल्या केसच्या संदर्भात माननीय डक साहेब व सर्वोच्च न्यायालयाचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. धाराशिव जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांची पीक विम्याची केस मी लढत होतो, त्यात 227 कोटी पीक विमा शेतकऱ्यांना देण्याचा या न्यायालयाने निर्णय दिला. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला साधारणता 9 हजार रुपये या निर्णयानंतर मिळणार आहेत. त्याबद्दल मी सर्वोच्च न्यायालयाचे आणि डक साहेबांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. अनिल जगताप यांनी म्हटले की, आज धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक दिवस ठरलेला आहे. माननीय ज्ञानराज चौगुले साहेबांनी सर्वोच्च न्यायालयात खरीप 2020 साठी इंटरव्हेंशन पिटीशन दाखल केलेलं होतं. आपले वकील साहेब आदरणीय अतुल डक साहेबांनी अतिशय जोरदार असा युक्तिवाद केला आणि सर्वोच्च न्यायालयाने धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 227 कोटी रुपये वाटप करण्याचे आदेश दिलेले आहेत. आपल्या सर्वांना माहिती आहे हे पैसे जमा आहेत, त्यामुळे या पैशांचे वितरण देखील येत्या आठ ते दहा दिवसांमध्ये होणार आहे.

एसटी चालकाला मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

मंत्री प्रताप सरनाईक यांचे पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांना निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

किरकोळ कारणावरून कर्तव्यावर असलेल्या एसटी चालकाला मारहाण केल्याच्या घटनेची परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणातील संबंधित आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांना दिले.

रस्त्यावर हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी एसटी चालकाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना मंत्री सरनाईक म्हणाले, एसटीचे चालक आणि वाहक ऊन, पाऊस तसेच दिवस-रात्र यांची तमा न बाळगता लाखो प्रवाशांच्या सेवेसाठी कर्तव्य बजावत असतात. अशा कर्मचाऱ्यांवर हात उगारणाऱ्या प्रवृत्तींची गय केली जाणार नाही. एसटी कर्मचारी एकटे नाहीत. त्यांच्या सन्मानाला आणि सुरक्षिततेला धक्का पोहोचवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या गुंडगिरीला महामंडळ खपवून घेणार नाही. महामंडळ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कर्तव्य बजावत असताना अशा प्रकारच्या घटनांना सामोरे जावे लागणाऱ्या कर्मचाऱ्यांनी



घाबरून न जाता अथवा कोणत्याही दबावाखाली न येता तातडीने एसटी महामंडळाच्या मुख्यालयाशी संपर्क साधावा. त्यांना महामंडळाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही मंत्री सरनाईक यांनी दिली.

गणवेश परिधान करून शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्याला मारहाण करणे ही गंभीर बाब असून, अशा घटनांमुळे कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची होते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या चालक आणि वाहकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींविरुद्ध लागू कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हे दाखल करावेत. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही मंत्री सरनाईक यांनी पोलीस प्रशासनाला दिले.

एसटीचे चालक आणि वाहक हे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा महत्वाचा कणा आहेत. त्यांच्या कर्तव्यात अडथळा आणणे, त्यांना धमकावणे अथवा मारहाण करणे अशा प्रकारांना आळा बसणे आवश्यक आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक परिस्थितीत महामंडळ त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असा ठाम निर्धार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

मुंबई-पुणे महानगर प्रदेशांतील पाणी पुरवठ्यासाठी दीर्घकालीन नियोजन करा – मुख्यमंत्री

मुख्यमंत्र्यांनी घेतला महानगर क्षेत्रांतील पाणी नियोजनाचा आढावा

■ धरण प्रकल्पांसह सांडपाणी पुनर्वापर, पाणीगळती नियंत्रण आणि पर्यायी स्रोतांवर भर द्या



■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगर प्रदेशासाठी २०५१ पर्यंत आणि पुणे महानगर प्रदेशासाठी २०४७ पर्यंतची लोकसंख्या, नागरीकरण तसेच उद्योगांची वाढती गरज लक्षात घेऊन एकात्मिक, कालबद्ध आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दीर्घकालीन जलनियोजन तयार करावे. नवीन प्रकल्पांबरोबरच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पाणीगळती नियंत्रण, पर्जन्यजल संचयन आणि पर्यायी जलस्रोतांवर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा या शासकीय निवासस्थानी मुंबई आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रांतील पाणी नियोजन व व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुंबई शहरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा आदींसह विविध अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण, उद्योग आणि डेटा सेंटरच्या वाढत्या गरजा विचारात घेऊन उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर, पर्यायी जल स्रोतांचा शोध घेणे तसेच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर वाढविण्यात यावा. तसेच सध्या राज्यात विशेषतः मुंबई व पुणे महानगरपरिसरात सुरू असलेले जलप्रकल्प वेळेत पूर्ण करणे, प्रस्तावित प्रकल्पांसाठी वन व पर्यावरणविषयक मान्यता, भूसंपादन आणि पुनर्वसनाची कार्यवाही समांतरपणे करणे तसेच उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महानगरपालिका आणि नगरपालिकांनी जललेखा परीक्षण करून पाण्याची आवक, वितरण आणि प्रत्यक्ष देयक आकारणी यांचा अचूक ताळमेळ ठेवावा. व्यावसायिक व औद्योगिक वापरासाठी स्मार्ट मीटरचा वापर वाढवून महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण टप्प्याटप्प्याने कमी करावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेशासाठी भातसा, पिंजाळ, तानसा, वैतरणा आदी विद्यमान स्त्रोत महत्त्वाचे आहेत. मात्र, या प्रदेशातील २०५१ पर्यंतच्या कालावधीत पाण्याच्या मागणीचा विचार करून उपलब्ध आणि प्रस्तावित पुरवठ्यातील तफावत दूर करण्यासाठी तातडीने बहुआयामी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील भविष्यातील पाण्याच्या उपलब्धतेसाठी प्रस्तावित काळू, देहरजी, बाळगंगा, कोंढाणे, खोलसापाडा, शिलार आणि अन्य जलप्रकल्पांच्या अंमलबजावणीतील वनजमीन, पर्यावरणविषयक मान्यता, भूसंपादन आणि पुनर्वसनाचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत. प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आवश्यक मान्यता घेऊन प्रकल्पांच्या कामांना गती देण्यात यावी.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी प्राधिकरणाच्या वतीने करण्यात येत असलेल्या जल नियोजनाची तसेच विविध जलस्रोतांची माहिती सादर केली. या सादरीकरणानुसार मुंबई महानगर प्रदेशाची लोकसंख्या सुमारे २.७५ कोटी आहे. २०५१ पर्यंत एकूण पाण्याची मागणी १६ हजार १३९ दशलक्ष लिटर प्रतिदिनपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे काम सुरू असलेल्या आणि प्रस्तावित धरण प्रकल्पांबरोबरच सांडपाण्याचा पुनर्वापर, सांडपाण्यावर दुय्यम व तृतीयक (टर्शरी) प्रक्रिया, स्वतंत्र वितरण वाहिन्या आणि पर्जन्यजल संचयनाचा समावेश जलनियोजनात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे महानगर प्रदेशात सांडपाण्यावर तृतीयक प्रक्रिया (टर्शरी) करून ते उद्योग, वीज प्रकल्प आणि डेटा केंद्रांसारख्या मोठ्या ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे. दुय्यम प्रक्रिया केलेले पाणी सिंचनासाठी वापरल्यास पिण्याच्या पाण्यावरील ताण कमी होईल. पाणीगळती तसेच मीटरविना होणाऱ्या पाणी पुरवठ्याचे प्रमाण कमी करावे. त्यासाठी चोवीस तास पाणीपुरवठा योजना, स्मार्ट मीटर आणि जुन्या जलवाहिन्यांची दुरुस्ती या उपायांवर भर देण्यात येणार आहे.

पुणे महानगरासाठी अतिरिक्त पाणी उपलब्धतेसाठी विविध उपायांवर भर द्या

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगरआयुक्त अभिजित चौधरी यांनी पीएमआरडीएने केलेल्या नियोजनाचे सादरीकरण केले. त्यानुसार, पुणे महानगर प्रदेशाची सध्याची लोकसंख्या सुमारे १.८० कोटी असून सन २०४७ पर्यंत ती ४.१२ कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. सध्या ३६.९० टीएमसी पाण्याचे आरक्षण उपलब्ध असून मागणी ४१.६५ टीएमसी आहे. सन २०४७ पर्यंत एकूण मागणी सुमारे १०० टीएमसी म्हणजेच ७ हजार ८१६ दशलक्ष लिटर प्रतिदिन होण्याचा अंदाज आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते दरेकरांच्या ‘D’ATHENA’ रेस्टॉरंटचे उद्घाटन

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरातील वाकड, पंडित पेट्रोल पंप समोर भूमकर चौक ते डांगे चौक परिसरात नव्याने सुरू झालेल्या ‘D’ATHENA’ या रेस्टॉरंटचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू तथा माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते तथा मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर आणि माजी विरोधी पक्षनेते नाना काटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उत्कृष्ट भोजन, दर्जेदार सेवा आणि ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेले हे रेस्टॉरंट आता नागरिकांच्या सेवेत दाखल झाले आहे. माजी नगरसेवक सतीशदादा दरेकर आणि त्यांचे सुपुत्र अभिजित दरेकर यांनी या नव्या व्यावसायिक उपक्रमाची सुरुवात केली आहे. त्यांच्या या नव्या वाटचालीचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले तसेच व्यवसायाच्या भरभराटीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक शेखर चिंचवडे, नगरसेविका शालिनीताई गुजर, सामाजिक कार्यकर्ते सारंग कामतेकर, शिवसेनेचे बाळासाहेब वाल्हेकर, माजी नगरसेविका सीमाताई सावळे, माजी नगरसेवक राजेंद्र साळुंखे, हरिभाऊ तिकोने, प्रवीण कुदळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, पत्रकार, दरेकर कुटुंबीय, मित्रपरिवार आणि स्नेही मोठ्या संख्येने उपस्थित होते..

नाल्यातील केमिकलयुक्त पाण्यामुळे नागरिकांना होणारा त्रास: लंगोटे

पिंपरी : दैनिक संध्या



काळभोर नगर येथील नाल्यातून रात्री १२.०० नंतर येणाऱ्या केमिकलच्या उग्र दुर्गंधीमुळे सूर्योदय कॉम्प्लेक्स व जय टॉवर येथील ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.यासाठी नगरसेविका अरुणा लंगोटे यांनी पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या दुर्गंधीमुळे काही नागरिकांना श्वास घेण्यास त्रास, उलट्या तसेच डोळ्यांची जळजळ अशा तक्रारी होत आहेत. या गंभीर बाबीबाबत मी दि. १६/११/२०२६ रोजी मुख्य अभियंता, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना लेखी पत्र दिले व त्वरित पाठपुरावा केला. संबंधित अधिकाऱ्यांनी याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवली. तसेच मी स्वतः मंचक जाधव, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याशीही याबाबत संपर्क साधला. त्यांच्या सूचनेनुसार दि. १८/११/२०२६ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाचे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

तीन महत्त्वपूर्ण विकासकामांसाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी

निगडी : दैनिक संध्या

निगडी परिसरातील विकासकामांना गती मिळण्याच्या दृष्टीने नगरसेविका सुलभा उबाळे यांनी महापालिका आयुक्तांकडे व स्थायी समिती मध्ये केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. निगडी स्मशानभूमीचा विकास, माता अमृतानंदमयी मठाकडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा तसेच अंकुश चौक ते त्रिवेणीनगर दरम्यान ग्रेड सेपरेटर उभारणे या तीन महत्त्वपूर्ण विकासकामांसाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी मिळाली आहे. निगडी स्मशानभूमीच्या विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच परिसरातील नागरिकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी सुलभा उबाळे यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्याचबरोबर माता अमृतानंदमयी मठाकडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली होती. या रस्त्याचा विकास झाल्यास परिसरातील नागरिकांसह मठात येणाऱ्या भाविकांचीही सोय होणार आहे. अंकुश चौक ते त्रिवेणीनगर दरम्यान वाढणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता या मार्गावर ग्रेड सेपरेटर उभारण्याची आवश्यकता असून, यासाठीही सुलभा उबाळे यांनी महापालिका आयुक्तांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या तिन्ही विकासकामांच्या नियोजनासाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी मिळाल्याने पुढील प्रक्रियेला गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या कामांच्या माध्यमातून निगडी परिसरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

शिरगाव येथील श्री साईबाबा ट्रस्ट मधील भ्रष्टाचारी विश्वस्तांवर कारवाई करा

■ पिंपरी(दै. संध्या)



शिरगाव, तालुका मावळ येथील श्री साईबाबा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व संलग्न श्री साईबाबा अन्नछत्र मंडळ यांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये सध्याचे विश्वस्त रवी जाधव व उमेश कविटकर आणि त्यांचे साथीदार यांनी पोलीस प्रशासन मधील काही अधिकारी व धर्मादाय आयुक्त कार्यालयातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून संगणमताने कोट्यवधी रुपयांचा अपहार, दानपेटीतील देणगी रकमेची अफरातफर, बनावट ठराव व दस्त ऐवजांमध्ये फेरफार तसेच आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा आरोप ट्रस्टचे संस्थापक व तहयात विश्वस्त उस्मान दगडू शेख यांनी केला आहे.

गुरुवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ट्रस्टचे संस्थापक व तहयात विश्वस्त उस्मान दगडू शेख, तहयात विश्वस्त समीर शेख, ॲड. अनघा कुलकर्णी, अक्षय धावरे, रामभाऊ गोपाळे व शिरगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

तहयात विश्वस्त समीर शेख यांनी यावेळी सांगितले की, हा सार्वजनिक न्यास नोंदणीकृत असून त्याची नोंदणी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय पुणे येथे दि. ९ सप्टेंबर २००२ रोजी करण्यात आली असून त्याचा नोंदणी क्रमांक इ/३६७४/पुणे असा आहे. यामध्ये एकूण ७ विश्वस्त असून यापैकी अध्यक्ष तत्कालीन आमदार प्रकाश देवळे हे होते. त्यावेळी देवळे यांच्या समवेत प्रसाद दत्तात्रय पाटील, प्रमोद माणिक शेठ दुगड, धोंडीराम बाबा चव्हाण, उस्मान दगडू शेठ आणि दिगंबर शेठ बाळासाहेब भेगडे, प्रा. नारायण सदाशिव फरांदे हे विश्वस्त होते. प्रकाश देवळे यांचे २४ सप्टेंबर २०२५ रोजी निधन झाल्यानंतर त्यांचे नातेवाईक रवी जाधव व उमेश कविटकर यांचे विश्वस्त म्हणून नाव लावण्यात आले. यानंतर रवी जाधव व उमेश कविटकर यांनी अनेक वेळा सध्याचे विश्वस्तांना विश्वासात न घेता बेकायदेशीर आर्थिक अफरातफर केली आहे असा आरोप केला. यामुळे या श्री साई मंदिरात भेट देण्यास येणाऱ्या साई भक्तांच्या भावनांचा अनादर झाला आहे. या ठिकाणी पुणे मुंबईतील मोठ्या शहरासह देश परदेशातून साईभक्त नवस बोलण्यासाठी व संकल्प सोडण्यासाठी येतात आणि श्रद्धेने येथे दान करतात यामध्ये सोने, चांदी, हिरे आधी मौल्यवान दागिन्यांसह रोख रकमेचा देखील समावेश असतो. यामध्ये लाखो रुपयांची दरमहा रक्कम जमा होते. यातील ठराविकच रक्कम संस्थेच्या बँक खात्यात जमा केली जाते व उर्वरित रक्कम त्यांच्या वैयक्तिक कामासाठी बेकायदेशीररित्या वापरली जात असल्याचा संशय आहे. संबंधितांनी अनेक वेळा बेकायदेशीरपणे दानपेटी फोडून यातील रोख रकमेचा अपहार केला आहे. बँकेत भरलेल्या रकमेचा देखील नोटांचा तपशील जुळत नाही. याविषयी आम्ही तक्रार केली असता त्यांनी दानपेटी नोटांच्या तपशिलाचे बोगस पेपर्स तयार केले हे देखील एकाच दिवशी एकाच व्यक्तीच्या अक्षरातील असल्याचा आरोप आहे याची देखील तपासणी व्हावी. तसेच संस्थेला या परिसरात दुकानदारांकडून मिळणारे भाडे याचा देखील तपशील जुळत नाही. याविषयी अनेक वेळा स्थानिक पोलीस प्रशासनांकडे तसेच धर्मादाय आयुक्त पुणे यांच्या कार्यालयात लेखी तक्रार आम्ही विश्वस्त व ग्रामस्थांनी केली आहे. मात्र आमच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून पोलीस प्रशासनातील काही अधिकारी व धर्मादाय आयुक्त कार्यालयातील काही अधिकारी रवी जाधव व उमेश कविटकर यांच्या समवेत या भ्रष्टाचारात सामील झाले असल्याचा संशय समीर शेख यांनी व्यक्त केला. तसेच या मंदिरात जमणाऱ्या निधीचा उपयोग स्थानिक गावाच्या विकास कामासाठी केला जावा अशी देखील मागणी ग्रामस्थांनी अनेक वेळा केली आहे. येथील अन्नछत्रातील दूषित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पवित्र नदीत सोडून दिले जाते त्यामुळे नदी प्रदूषण व परिसरात पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. याविषयी भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करावी अन्यथा १५ डिसेंबर २०२६ पासून माननीय जिल्हाधिकारी पुणे यांच्या कार्यालयासमोर आम्ही उर्वरित विश्वस्त तसेच शिरगावचे ग्रामस्थ आंदोलन व उपोषण करू असा इशारा या पत्रकार परिषदेत समीर शेख यांनी दिला.

वाकडमध्ये कंटेनर आणि कारचा भीषण अपघात; कार जळून खाक

■ वाकड (दै. संध्या)



पुणे-बेंगळुरू महामार्गावरील वाकड येथील भुजबळ चौकात मध्यरात्रीच्या सुमारास कंटेनर आणि कारचा भीषण अपघात झाला. या अपघातानंतर कारने अचानक पेट घेतल्याने संपूर्ण कार जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास भुजबळ चौक परिसरात कंटेनर आणि कारची जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी होती की, कारने तत्काळ पेट घेतला. आगीने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समजते. दरम्यान, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. स्थानिक पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

सूर्यवंशी यांच्याकडील अतिरिक्त पदभार काढला

■ पिंपरी(दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कथित गैरव्यवहार, निविदा प्रक्रियेतील अनियमितता आणि प्रशासकीय कारभाराबाबत नगरसेवक विनोद नढे यांनी उपस्थित केलेल्या गंभीर प्रश्नांची दखल घेत महापालिका प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडील पाणीपुरवठा विभागाचा अतिरिक्त पदभार आयुक्तांच्या आदेशाने काढून घेण्यात आला आहे.

नगरसेवक विनोद नढे यांनी दि.३ नोव्हेंबर २०२६ रोजी महापालिका आयुक्तांना सविस्तर पत्र देऊन पाणीपुरवठा विभागातील कामकाजाबाबत गंभीर आक्षेप नोंदवले होते. पाणीपुरवठा विभागातील निविदा प्रक्रिया, कामांच्या मंजुरीतील अनियमितता, कथित लाच मागणी प्रकरण तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली होती.

नढे यांनी आपल्या पत्रात सुमारे १९ हजार रुपयांच्या कथित लाच मागणीच्या प्रकरणाचा उल्लेख करत या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली होती. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना अतिरिक्त विभागीय जबाबदारी देण्याबाबतही आक्षेप नोंदवले होते.

या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांनी सामान्य प्रशासन विभागामार्फत आदेश निर्गमित करून सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे सोपविण्यात आलेला पाणीपुरवठा विभागाचा अतिरिक्त पदभार निरस्त केला आहे. तसेच शहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे पाणीपुरवठा विभागाचे विभागप्रमुख म्हणून असलेली जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. नागरिकांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा केल्यास प्रशासनाला निर्णय घ्यावेच लागतात, हे या प्रकरणातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. महापालिकेच्या कारभारात पारदर्शकता असावी, जनतेच्या पैशांचा विनियोग नियमानुसार व्हावा आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित व्हावी, हीच आपली भूमिका असल्याचे नगरसेवक विनोद नढे यांनी स्पष्ट केले आहे.

पॅराग्लायडिंग साहसी खेळ टिकणार : खासदार बारणे

■ मावळ (दै. संध्या)



मावळ तालुक्यातील कामशेतमधील पॅराग्लायडिंग हिल हा साहसी खेळ वाचविण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याबरोबर गुरुवारी महत्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये वीज वाहिनीचा मार्ग बदलण्याचे महत्वाचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे पॅराग्लायडिंगला कोणतीही अडचण येणार नसल्याचे स्पष्ट झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

कामशेत पॅराग्लायडिंग असोसिएशनचे अध्यक्ष संजय एम राव, उपाध्यक्ष विनोद शेलार, विद्युत वाहिनीचे काम करणारे अदानी पॉवरचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते. कामशेत येथील प्रस्तावित वीज वाहिन्यांच्या पोलमुळे पॅराग्लायडिंग हिलला अडथळा निर्माण होणार होता. याबाबत कामशेत पॅराग्लायडिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार बारणे यांची भेट घेऊन वीजवाहिनीच्या मार्गात बदल करण्याची मागणी केली होती. त्यावर खासदार बारणे यांनी केंद्रीय विद्युत मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल यांची भेट घेतली होती. तीन खांबासाठी ३० वर्षांपासून चालू असलेला पॅराग्लायडिंग हा क्रीडा प्रकार बंद करणे चुकीचे आहे. पोल बाजूने घेता येऊ शकतात, असे सांगितले. त्यावर अग्रवाल यांनी खासगी कंपनीशी चर्चा करुन फेरसर्व्हे करावा. पोल बाजूने घेऊन जावेत, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी वीज वाहिनीचा मार्ग बदलावा. कोणत्याही परिस्थितीत या खेळाला अडथळा येता कामा नये, असे आदेश त्यांनी संबंधितांना दिले आहेत. त्यामुळे गेल्या ३० वर्षांपासून विकसित झालेला पॅराग्लायडिंग हिल हा क्रीडा प्रकार कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. हा खेळ महाराष्ट्रात केवळ पाचगणी, कामशेतमध्येच खेळला जातो, असे खासदार बारणे यांनी सांगितले.कामशेत येथील 'टॉवर हिल' हे पॅराग्लायडिंगसाठी अत्यंत महत्त्वाचे ठिकाण असून, येथे दरवर्षी हजारो देशी-विदेशी पर्यटक आणि शेकडो प्रशिक्षणार्थी पायलट येत असतात. सुनीत राव यांसारख्या आंतरराष्ट्रीय पायलटनी येथूनच प्रशिक्षण घेऊन जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावले आहे. तसेच, सप्टेंबर ते मार्च या पूर्वेकडील वाऱ्यांच्या हंगामात उड्डाणांसाठी टॉवर हिलशिवाय दुसरा कोणताही व्यवहार्य पर्याय उपलब्ध नाही.

उड्डाणाची संधी उपलब्ध

गेल्या तीन दशकांपासून कामशेत हे भारतातील प्रमुख पॅराग्लायडिंग स्थळ म्हणून ओळखले जाते. येथे मनोरंजनात्मक उड्डाणे, व्यावसायिक टँडम उड्डाणे, वैमानिक प्रशिक्षण तसेच स्पर्धात्मक विमान क्रीडा उपक्रम चालतात. भौगोलिक स्थान, डोंगररचना, उंची आणि अनुकूल वाऱ्याच्या परिस्थितीमुळे हे स्थळ अत्यंत महत्त्वाचे आहे. येथे वर्षातील जवळपास आठ ते नऊ महिने उड्डाणाची संधी उपलब्ध असते. देशभरातील वैमानिक घडवण्यासाठी हे एक महत्त्वाचे प्रशिक्षण केंद्र आहे. या स्थळाने भारतातील पॅराग्लायडिंग समुदाय विकसित करण्यात आणि सुरक्षित उड्डाण पद्धती निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १,२४६ कोटींच्या नव्या कर्ज प्रस्तावाला मनसेचा विरोध!

पवना, भामा आसखेड व ड्रेनेज योजनांची १५ दिवसांत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याची मागणी; सचिन चिखले यांचे आयुक्तांना निवेदन

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पासाठी ७०० कोटी रुपये आणि ड्रेनेज मास्टर प्लॅनसाठी ५४६.५० कोटी रुपये असे एकूण १ हजार २४६.५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीव्र विरोध दर्शविला असून, नागरिकांवर नव्या कर्जाचा बोजा लादण्याऐवजी आधी सुरू असलेल्या योजनांचा खर्च, सद्यस्थिती आणि प्रत्यक्ष लाभ यांचा हिशेब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी मनसेचे नगरसेवक व गटनेते सचिन तुकाराम चिखले यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पाणी योजनांना विरोध नाही, मात्र पैशाच्या अपव्ययाला विरोध आहे, अशी भूमिका मनसेने स्पष्ट केली आहे. पिंपरी-चिंचवडकरांना दररोज मुबलक पाणी मिळाले पाहिजे. पवना जलवाहिनी पूर्ण झाली पाहिजे आणि भामा आसखेडमधूनही पाणी मिळाले पाहिजे. मात्र, कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही नागरिकांना अपेक्षित लाभ मिळत नसेल, तर पुन्हा कर्ज काढून त्याचा आर्थिक भार नागरिकांवर टाकणे योग्य नसल्याचे चिखले यांनी म्हटले आहे.

महापालिकेवर यापूर्वीच ३६४.५१ कोटी रुपयांचे कर्ज थकीत असून, ठेकेदारांची ४ हजार ४९३ कोटी रुपयांची देणी आणि लवादासंबंधित ५२७ कोटी रुपयांची प्रकरणे प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत नव्याने १ हजार २४६.५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा निर्णय आर्थिकदृष्ट्या घातक ठरू शकतो, असा आक्षेप मनसेने घेतला आहे.

यासाठी मनसेने नाशिक फाटा डबल डेकर पुलाचे उदाहरण दिले आहे. या प्रकल्पासाठी १५९.९१ कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले होते. त्यापैकी ९१.९० कोटी रुपये फेडले असले तरी अद्याप ६८.०१ कोटी रुपये बाकी आहेत. तसेच मदर तेरेसा आणि एम्पायर इस्टेट पुलासाठी ९९.४२ कोटी रुपये खर्च झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विकासकामांच्या नावाखाली कर्ज घेऊन त्याची परतफेड अनेक वर्षे नागरिकांच्या पैशातून करावी लागत असल्याचे मनसेने निदर्शनास आणून दिले आहे.

पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला मावळमधील स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांचा विरोध असल्याने यापूर्वीही काम रखडले होते. त्यावेळी टाकण्यात आलेले पाईप तसेच पडून राहिल्याने कोट्यवधी रुपयांचा खर्च वाया गेल्याचा आरोप चिखले यांनी केला आहे. स्थानिकांना विश्वासात न घेता पुन्हा ७०० कोटी रुपयांचे कर्ज घेऊन काम सुरू केल्यास पुन्हा विरोध, काम बंद आणि आर्थिक नुकसान अशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे मावळमधील स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांचा विरोध दूर करावा, त्यांच्या पाण्याच्या हक्काचा विचार करावा आणि त्यानंतरच प्रकल्पाचे काम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पवना योजनेवर यापूर्वी २०० कोटी रुपये खर्च करूनही वाढीव पाण्याचा एक थेंबही मिळाला नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. सुरुवातीला ४०० कोटींचा असलेला प्रकल्प आता १ हजार ४०० ते १ हजार ५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचेही नमूद करण्यात आले आहे. तसेच JNNURM खात्यात ५१६.३१ कोटी रुपये पडून असल्याचा उल्लेख करून हे पैसे प्रथम पाणी योजनेसाठी वापरण्याची मागणी करण्यात आली आहे.भामा आसखेड योजनेवर २५० ते ३०० कोटी रुपये खर्च होऊनही अद्याप प्रत्यक्ष पाणी मिळाले नसल्याचा आरोप मनसेने केला आहे. १६२ कोटी रुपयांच्या कंत्राटात पाच वर्षांत केवळ ७० टक्के काम पूर्ण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. दुसरीकडे, ड्रेनेज आणि नदी पुनरुज्जीवन योजनांवर ८८० कोटी रुपयांहून अधिक खर्च किंवा मंजुरी असूनही शहरातील ड्रेनेज तुंबण्याचे प्रकार सुरूच आहेत. नद्यांमध्ये सांडपाणी मिसळत असल्याने या योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेड्युल बीवर आणखी कर्जाचा बोजा टाकल्यास भविष्यात नागरिकांवर पाणीपट्टीवाढीचा भार पडू शकतो, अशी भीती मनसेने व्यक्त केली आहे. मोशी येथील रुग्णालयाच्या बांधकामावर सुमारे १७० कोटी रुपये खर्च झाले असून, ८० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात असताना उर्वरित काम सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) तत्त्वावर देण्याची गरज काय, असा सवालही चिखले यांनी उपस्थित केला आहे. आतापर्यंत झालेला खर्च आणि प्रस्तावित PPP कराराचा तपशील जनतेसमोर जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

मनसेच्या प्रमुख मागण्या

महापालिकेने प्रस्तावित १ हजार २४६.५० कोटी रुपयांचा कर्ज प्रस्ताव तात्काळ रद्द करावा, पवना, भामा आसखेड आणि ड्रेनेज योजनांची संपूर्ण श्वेतपत्रिका १५ दिवसांत प्रसिद्ध करावी, JNNURM खात्यातील ५१६.३१ कोटी रुपये प्रथम पाणी योजनेसाठी वापरावेत, मावळमधील स्थानिक नागरिकांचा विरोध दूर करून त्यांना विश्वासात घ्यावे, मोशी रुग्णालयाचा खर्च व PPP कराराचा तपशील सार्वजनिक करावा आणि कोणतेही नवीन कर्ज घेण्यापूर्वी सर्वपक्षीय नगरसेवक व नागरिकांचा सल्ला घ्यावा, अशा सहा प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत."आम्हाला पाणी हवे आहे, पण कर्जाचा बोजा नको. विकास हवा आहे, पण भ्रष्टाचार आणि पैशाचा अपव्यय नको," अशी ठाम भूमिका मनसेने मांडली आहे. महापालिका आयुक्तांनी या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही सचिन चिखले यांनी दिला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



बाळासाहेबांच्या छायाचित्राचा अवमान?, ठाकरे शिवसैनिकांचा संताप अनावर,

चाकण : दैनिक संध्या

हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे लाखो शिवसैनिकांचे श्रद्धास्थान असून, त्यांच्या छायाचित्राचा अवमान झाल्याचा आरोप पुढे आल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेचे पडसाद आता चाकण (ता. खेड) येथे उमटले असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी आक्रमक भूमिका घेत रस्त्यावर उतरून निषेध व्यक्त केला. मुंबई येथे झालेल्या पत्रकार परिषदेत शिंदे गटाच्या प्रवक्त्या शायना एन. सी. यांच्या हातून बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र असलेला फोटो फाडल्याचा व्हिडिओ समोर आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. याचाच निषेध व्यक्त करण्यासाठी चाकण येथे खेड तालुका शिवसेनेच्या वतीने शायना एन.सी.यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे केवळ एका राजकीय पक्षाचे नेते नसून महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासातील प्रभावी व्यक्तिमत्त्व मानले जातात. शिवसेनेची स्थापना करून त्यांनी राज्यभरात शिवसैनिकांची मोठी संघटनात्मक फळी उभी केली. त्यामुळे त्यांच्या छायाचित्राचा अवमान सहन केला जाणार नसल्याचे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करत निषेध व्यक्त केला. या प्रकरणावर शिंदेसेनेच्या प्रवक्त्या शायना एन.सी. यांनी स्पष्टीकरण देताना शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर दिलगिरी व्यक्त केली. परंतु आमच्या सारख्या निष्ठावंत शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या आहेत.याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो असे महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख विजया शिंदे यांनी सांगत शायना एन.सी.यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. यावेळी प्रकाश भुजबळ, गणेश मांडेकर, शेखर घोगरे, लक्ष्मण जाधव, कविता करपे, रूपाली कांबळे, मंगेश पराड, स्वामी कानपिळे, शेखर पिंगळे, पांडुरंग गोरे आदी उपस्थित होते. दरम्यान, या घटनेमुळे शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गट यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आधीच दोन्ही गटांमध्ये राजकीय वर्चस्ववरून संघर्ष सुरू असताना, बाळासाहेबांच्या छायाचित्राच्या कथित अवमानाच्या मुद्द्याने या संघर्षाला नवे वळण मिळाले आहे.

चाकणमध्ये राजकीय वातावरण तापले!

बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाशी आणि विचारांशी भावनिक नाते जोडलेल्या शिवसैनिकांनी या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. शायना एन.सी. यांनी दिलगिरी व्यक्त केली असली तरी ठाकरे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या प्रकरणावर आपली भूमिका कायम ठेवणार का, तसेच या आंदोलनाचे पुढील पडसाद काय उमटणार, याकडे चाकणसह संपूर्ण खेड तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीनमधील उद्यानाचे काम युद्धपातळीवर

चाकण : दैनिक संध्या

आधी केले मग सांगितले, हे ब्रिद सत्यात उतरवणाऱ्या चाकण नगरपरिषदेच्या प्रथम महिला कर्तव्यदक्ष उपनगराध्यक्षा सुवर्णाताई राक्षे व कार्यक्षम नगरसेवक अनिल लोहकरे यांच्या पाठपुराव्यामुळे सुरू असलेल्या चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीनमधील नमो उद्यानाचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व गटनेते नितीन गोरे तसेच मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण नगरपरिषद हद्दीतील कामांना वेग आला आहे. विशेष म्हणजे प्रभाग क्रमांक तीनच्या कर्तव्यदक्ष नगरसेविका सुवर्णाताई श्यामराव राक्षे व नगरसेवक अनिल लोहकरे हे नमो उद्यानाचे काम तातडीने पूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहेत. गेल्या सहा महिन्यांपूर्वी मंजूर करण्यात आलेल्या या कामासाठी सव्वा कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. सर्व सोयींनीयुक्त अद्ययावत असे उद्यानाचे काम लवकरच पूर्ण होऊन चाकणकर नागरिकांसाठी हे उद्यान तातडीने खुले करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी सांगितले. नमो उद्यानाच्या कामाला चाकण नगरपरिषद प्रशासनासह राक्षेवाडीतील ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे. गेल्या अनेक वर्षापासून या भागात नमो उद्यान सारखे प्रकल्प व्हावेत, अशी ग्रामस्थांची मागणी होती. सुवर्णाताई राक्षे व अनिल लोहकरे यांनी यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश आले. नमो उद्यान या सुरू असलेल्या आद्ययावत प्रकल्पाचे नगरसेविका रूपाली कांडगे, आरती परदेशी, प्रकाश गोरे, मंगेश कांडगे तसेच शिवसेनेचे चाकण शहर उपप्रमुख प्रकाश राजनकर, किरण कौटकर, उद्योजक श्यामभाऊ राक्षे, श्रीकांत जाधव, शहाजी राक्षे, विकास राक्षे आदीनी या उपक्रमाचे कौतुक केले.

पडवीच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचा जिल्हास्तरावर गौरव

दौंड : दैनिक संध्या

सभापती माननीय अमोल नलावडे यांच्या हस्ते पडवी येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयातील पशुधन पर्यवेक्षक डॉ. रवींद्र बांगर यांना उत्कृष्ट सेवाकार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुणे जिल्ह्यामध्ये राबविण्यात आलेल्या 'पशुवैद्यक डॉक्टर आपल्या गावी' या उपक्रमाची पडवी येथे अतिशय उत्कृष्टपणे अंमलबजावणी करण्यात आली. पुणे जिल्हा पशुसंवर्धन विभागामध्ये पडवी येथील पशुवैद्यकीय दवाखाना पहिला 'बोलका पशुवैद्यकीय दवाखाना' म्हणून विकसित करण्यात आला. या नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल डॉ. बांगर यांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच जागतिक अंडी दिन, जागतिक रेबीज दिन यांसारखे जनजागृतीपर उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने राबविण्यात आले. या माध्यमातून नागरिक आणि पशुपालकांमध्ये पशुसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याचे काम करण्यात आले. दुष्काळसदृश परिस्थिती आणि चारा-पाणी टंचाईच्या काळात जनावरांचे वैरण व पाणी व्यवस्थापन कसे करावे,

वाहतूक कोंडीने विद्यार्थ्यांसह नागरिकांचे हाल



■ चाकण (दै. संध्या)

चाकण मधील पुणे - नाशिक महामार्ग आणि तळेगाव - चाकण - शिक्रापूर महामार्गावर वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांच्या क्षमतेत अपेक्षित वाढ न झाल्याने चाकण परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. नित्याच्या वाहतूक कोंडीने विद्यार्थ्यांसह नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे.

चाकण भागातील औद्योगिक विकासाच्या वेगाने वाहनांची संख्या चौपटीने वाढली. मात्र रस्त्यांची रुंदी आणि मूलभूत पायाभूत सुविधा जुन्याच क्षमतेच्या राहिल्या आहेत. परिणामी, दररोज वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पुण्याहून नाशिककडे जाणाऱ्या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. या वाहतूक कोंडीत कामगार, प्रवासी, विद्यार्थी यांच्यासह रुग्णवाहिकाही अडकत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. येथील औद्योगिक वसाहतीचा विस्तार, तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांची वाढ, वाढते नागरीकरण आणि अवजड वाहनांची सततची वर्दळ यामुळे या दोन्ही महामार्गांवरील वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. हजारो मालवाहू ट्रक, कंटेनर, बस, खासगी वाहने आणि दुचाकी एकाच रस्त्यावरून धावत असताना उपलब्ध रस्ते मात्र वाढलेल्या वाहतुकीचा भार पेलण्यास अपुरे पडत आहेत. त्यामुळे अपघात वाढले आहेत. चाकण परिसरात दररोज सात ते आठ किलोमीटर वाहनांच्या रांगा लागत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. कामगार व विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहे. पुणे बाजू कडून नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर वाहनांचा वेग मंदावून मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. काही ठिकाणी वाहनांच्या सात ते आठ किलोमीटरपर्यंत रांगा लागतात. अवजड वाहनांची मोठी संख्या, अरुंद रस्ते आणि वाढलेला वाहतुकीचा ताण यामुळे वाहनचालकांना तासनतास एकाच ठिकाणी थांबावे लागत आहे. या कोंडीचा सर्वाधिक फटका औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या कामगारांना बसत आहे. कामावर वेळेत पोहोचणे आणि काम संपल्यानंतर घरी परतणे कठीण झाले आहे. विद्यार्थी, शाळकरी मुले, खासगी प्रवासी वाहने आणि अत्यावश्यक सेवांनाही या कोंडीचा फटका सहन करावा लागतो. रुग्णवाहिकांना मार्ग मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याने रुग्णांच्या जीविताशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

काही ठिकाणी अतिक्रमणे हटविण्यात आली असली, तरी वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेऊन तात्पुरत्या स्वरूपातही रस्त्यांचे आवश्यक रुंदीकरण करण्यात आलेले नाही. तळेगाव चौक आणि आंबेठाण चौकातील अवैध रिक्षा थांबे तसेच रिक्षांची वाढती संख्या वाहतूक कोंडीत भर घालत आहे. या ठिकाणी रिक्षांचे नियमन, अधिकृत थांब्यांची निश्चिती आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या बाबींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.

रिक्षा चालकांवर कारवाईची गरज

वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरण, पर्यायी मार्ग, चौकांचे नियोजन, अवजड वाहनांचे व्यवस्थापन आणि रिक्षा थांब्यांचे नियमन या उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. औद्योगिक विकासाचा वेग वाढत असताना अपुऱ्या रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिकच गंभीर होत चालला आहे.

" चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलामुळे चाकणला दररोज तुफान वाहतूक कोंडी होते. या वाहतूक कोंडीने नागरिकांचा जीव गुदमरला असून सर्वजण अक्षरशः रडकुंडीला आले आहेत. चाकणकर नागरिक मरण यातना सहन करत असताना प्रशासन लक्ष देत नाही ही धक्कादायक बाब आहे. वाहतूक कोंडी मार्गी लागण्यासाठी प्रशासनाने तातडीच्या उपाययोजना करण्याची गरज आहे."

- विजयाताई जाधव, नगरसेविका, चाकण.

" चाकण मध्ये पार्किंग व्यवस्थेचा अभाव असल्याने वाहतूक कोंडीला निमंत्रण मिळते. अवजड वाहनांची वाढती संख्या, अतिक्रमणात भर, महामार्गावर बंद पडणारी वाहने, ओव्हरटेक यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी मार्गी लावण्यासाठी पोलीस प्रशासन विशेष प्रयत्न करत आहे."

- दीपक गोसावी, पोलीस निरीक्षक, चाकण वाहतूक विभाग.

दुचाकी व चारचाकींवर बेकायदा लेझर लाईटचा वापर

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

पूर्व हवेली परिसरात वाहनांना बसविण्यात येणाऱ्या हायपॉवर एलईडी ब्लिंकर लेझर लाईटचा सध्या मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पुणे-सोलापूर महामार्गासह महामार्गालगतच्या अनेक गावांमध्ये दुचाकी आणि चारचाकी वाहनांना अशा प्रकारचे प्रखर, डोळ्यांना त्रासदायक ठरणारे ब्लिंकर लाईट बसविण्यात आले आहेत. या लाईटच्या तीव्र प्रकाशामुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांना काही क्षण रस्त्यावरील परिस्थिती स्पष्ट दिसत नसल्याने गंभीर अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, रात्रीच्या वेळी या लेझर ब्लिंकर लाईटचा वापर अधिक धोकादायक ठरत आहे. समोरून येणाऱ्या वाहनांच्या चालकांच्या डोळ्यांवर थेट प्रखर प्रकाश पडत असल्याने वाहनावरील नियंत्रण सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुचाकीस्वार, चारचाकी चालक तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न यामुळे ऐरणीवर आला आहे. वाहनांना आकर्षक लूक देण्याच्या नादात काही वाहनधारकांकडून अशा प्रकारच्या हायपॉवर लाईटचा वापर केला जात आहे. मात्र, स्वतःच्या हौसेसाठी दुसऱ्यांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार कितपत योग्य आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. पुणे-सोलापूर महामार्ग हा पूर्व हवेलीतील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या मार्गावर दिवसरात्र वाहनांची मोठी ये-जा सुरू असते. अशा परिस्थितीत डोळ्यांना त्रासदायक ठरणाऱ्या प्रखर ब्लिंकर लेझर लाईटचा वापर सुरू राहिल्यास एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. महामार्गावर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जात असताना, वाहनांना बसविण्यात आलेल्या अशा धोकादायक अतिरिक्त लाईटवर कारवाई का होत नाही? वाहतूक पोलीस आणि आरटीओ प्रशासन एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे का? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. त्यामुळे पूर्व हवेलीतील पुणे-सोलापूर महामार्गासह उरुळी कांचन, लोणी काळभोर आणि परिसरातील गावांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवून नियमबाह्य व वाहनचालकांना त्रासदायक ठरणाऱ्या हायपॉवर ब्लिंकर लेझर लाईटवर तातडीने कारवाई करावी. संबंधित वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करून अशा लाईटचा वापर बंद करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अपघात झाल्यानंतर जागे होण्यापेक्षा अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने आताच ठोस पावले उचलावीत, हीच नागरिकांची अपेक्षा!



" ब्लिंकर लाईट मुळे समोरचा रस्ताही दिसत नाही तसेच पादचारी दिसत नाही, त्याच्यामुळे वाहन जागेवर थांबवावे लागते नाहीतर अपघात होण्याचे शक्यता जास्त असते, अशा हाय पावर ब्लींकर लेझर लाईटवर प्रशासनाने कारवाई करावी.

- अमित वाघ- नागरिक

मृदुंगमणी ह.भ.प भास्कर विठ्ठल राजगुरू यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान

■ नारायणगाव(दै. संध्या)



वारकरी संप्रदायाची परंपरा आणि भक्तीचा वारसा गेली ५० वर्षे अविरतपणे जपणाऱ्या ज्येष्ठ मृदंगमणी भास्कर विठ्ठल राजगुरू यांना आनंदी युनिव्हर्सल प्रतिष्ठेच्या 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

'आनंदी युनिव्हर्सल' संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

भास्कर विठ्ठल राजगुरू यांनी आपल्या मृदंग वादनाच्या माध्यमातून गेली पाच दशके वारकरी संप्रदायाची निस्सीम सेवा केली आहे. त्यांच्या या प्रदीर्घ साधनेची, कलागुणांची आणि आध्यात्मिक क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत 'आनंदी युनिव्हर्सल'ने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या सोहळ्याला वारकरी संप्रदायातील मान्यवर महाराज मंडळी, कीर्तनकार, सामाजिक क्षेत्रातील दिग्गज आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर भास्कर राजगुरू यांनी आयोजकांचे आभार मानले आणि आपली ही सेवा अशीच अखंड सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर शिवनेरी पतसंस्थेच्या ठेवीदारांचे उपोषण स्थगित

■ नारायणगाव(दै. संध्या)



शिवनेरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या मालमत्ता जप्ती आणि थकीत रकमेच्या वसुलीच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या ठेवीदारांनी प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आपले उपोषण मागे घेतले. १७ तारखेपासून सुरू असलेल्या या उपोषणाची तहसील प्रशासनाने दखल घेत पुढील कार्यवाहीबाबत लेखी पत्र दिल्याने ठेवीदारांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार शिवनेरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संबंधित मालमत्तांचा लिलाव करून ठेवीदारांची रक्कम व्याजासह वसूल करून देण्याची मागणी करण्यात आली होती. यासाठी प्रदीप गणपत कर्पे, ठकूबाई कर्पे, शांताराम हिंगे, नंदा गांगरे आणि सुनंदा रासकर यांनी तहसील कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. संबंधित मालमत्ता जप्त कराव्यात आणि ठेवीदारांची नावे इतर अधिकार अभिलेखात नोंदवावीत, अशी त्यांची मागणी होती. या प्रकरणी जुन्नर तहसील कार्यालयाच्या कुळकायदा शाखेने महाराष्ट्र जमीन महसूल वसुली नियम १९६७ मधील नियम ११ नुसार स्थावर मालमत्ता जप्तीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत पत्र दिले आहे. शिवनेरी नागरी पतसंस्थेच्या नावे असलेल्या मालमत्तांबाबत संबंधित गावांतील तलाठी व मंडळ अधिकारी स्तरावर नोटिसा देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधित मालमत्तांच्या इतर अधिकार अभिलेखात कर्जदारांची नावे नोंदविण्याबाबत भूमी अभिलेख कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात येणार असल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.तहसीलदार रणजीत भोसले आणि भूमी अभिलेख उपअधीक्षक मंगल गवळी यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर ठेवीदारांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी संदीप तापकीर ; स्वागताध्यक्षपदी नगरसेवक कांबळे

■ मोशी (दै. संध्या)

पाचव्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी इतिहास संशोधक व साहित्यिक संदीप भानुदास तापकीर यांची, तर स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ नगरसेवक डॉ.सुहास कांबळे यांची निवड करण्यात आली. इंद्रायणी साहित्य परिषदेच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारिणी बैठकीत या निवडींवर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. परिषदेचे कार्याध्यक्ष सोपान खुडे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही २० डिसेंबर रोजी मोशी येथील जयगणेश सभागृहात हे साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनात नामवंत साहित्यिक, विचारवंत आणि साहित्यप्रेमींचा सहभाग असणार असून, विविध साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे.

संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले संदीप तापकीर हे इतिहास संशोधक आणि साहित्यिक म्हणून परिचित आहेत. महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांवर त्यांनी जिल्हानिहाय आठ पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या 'छत्रपती शिवराय' या मराठी शिवचरित्राचा हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेत अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. तसेच त्यांनी शंभरहून अधिक पुस्तकांचे संपादन केले आहे.

स्वागताध्यक्ष डॉ.सुहास कांबळे हे प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ असून, मोशी येथील साईनाथ रुग्णालयाचे संचालक आहेत. संवेदनशील आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. कला व साहित्याची विशेष आवड असलेल्या डॉ. कांबळे यांची यंदा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नगरसेवकपदी निवड झाली आहे.दरम्यान, इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने नवनियुक्त संमेलनाध्यक्ष संदीप तापकीर आणि स्वागताध्यक्ष डॉ.सुहास कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी साहित्यिक श्रीकांत चौगुले, व्याख्याते प्रा. प्रदीप कदम, निलेश गावडे, गणेश साहेबराव सस्ते, संतोष गोलांडे, भानुदास तापकीर आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीस डॉ.सीमा काळभोर, डॉ. पौर्णिमा कोल्हे, दामोदर वहिले, योगेश कोंढाळकर, श्रीहरी तापकीर, माणिक सस्ते, काळुराम सस्ते, संगीता थोरात, सुनील जाधव, तेजस्विनी देशमुख, संतोष सस्ते, अशोक ढोकले, महिपती साठे, अलंकार हिंगे, गोविंद आल्हाट आदी उपस्थित होते.



पुणे महानगरपालिका

उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ क्र. ३

निविदा जाहिरात - नविन कामे

प्रसिद्धी दिनांक : २१/११/२०२६ वर्तमान पत्राचे नाव - दै. पुणे मिरर/दै. संध्या

विक्री कालावधी दिनांक :- २१/११/२०२६ ते ०१/१२/२०२६ वेळ :- दु.१२.०० पर्यंत

स्वीकृती कालावधी दिनांक :- २१/११/२०२६ ते ०१/१२/२०२६ वेळ :- दु.१२.०० पर्यंत टेंडर उघडणे दिनांक :- ०२/१२/२०२६ दुपारी १२.०० वाजता.

अ. क्र.	निविदा क्रमांक	विभागाचे/ खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत	अंदाजित पुर्वगणित रक्कम	बयाणा रक्कम	कामाची मुदत
1	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/733	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ड मधील जनता बाग येथे विविध विकास कामे करणे	४१५	८४७३५९.००	८४७४	१८० दिवस
2	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/734	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ड मधील जनता वसाहत गल्ली क्र. १ ते २५ येथे विविध ठिकाणी कॉक्रिटीकरण करणे व पायऱ्यांची दुरुस्ती करणे	४१५	८४४५६७.००	८४४६	१८० दिवस
3	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/735	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये तुकाई नगर परिसरात विविध विकास कामे करणे	४१५	८४४६८०.००	८४४७	१८० दिवस
4	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/736	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. २८ ड मधील जनता वसाहत पानमळा दत्तवाडी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी लोखंडी बेंच बसविणे	४१५	८४६६८१.००	८४६७	१८० दिवस
5	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/737	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये खाडे वॉशिंग सेंटर ते व्हेईकल डेपोपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे.	१३५९	१६८७२९२.००	१६८७३	१८० दिवस
6	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/738	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये नॅशनल पार्क परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे.	१३५९	१६८९९३९.००	१६८९९	१८० दिवस
7	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/739	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत कोंढवे धावडे येथील स्मशानभूमी दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४२२०३.००	८४२२	१५० दिवस
8	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/740	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ब मध्ये जिजाऊनगर वडगांव बु.परिसरात रस्ता डांबरीकरण करणे.	४१५	८४१६४०.००	८४१६	१८० दिवस
9	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/741	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये सनसिटी रस्ता परिसरातील बसस्टॉप नुतनीकरण करणे	४१५	८४६५८२.००	८४६६	१८० दिवस
10	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/742	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील रोकडोबा मंदिर ते श्रीरंग अपार्टमेंट पर्यंत व इतर परिसरातील ब्लॉक दुरुस्त करणे.	४१५	८४४२९५.००	८४४३	१८० दिवस
11	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/743	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये अथर्व नगर, हिंगणे खु येथे डांबरी रस्ते विकसित करणे	१३५९	२११०४८३.००	२११०५	१८० दिवस
12	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/744	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये साईधाम सोसायटी वडगाव बुद्रुक येथे फुटपाथ दुरुस्ती करणे.	४१५	८४४७१९.००	८४४७	१८० दिवस
13	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/745	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये आनंदनगर विठ्ठलनगर व इतर परिसरातील ड्रेनेज लाईन दुरुस्ती व साफसफाई विषयक कामे करणे.	४१५	८४२४५१.००	८४२५	१८० दिवस
14	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/746	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये हिंगणे खुर्द सनसिटी व इतर परिसरातील ड्रेनेज लाईन दुरुस्ती व साफसफाई विषयक कामे करणे.	४१५	८४२४५६.००	८४२५	१८० दिवस
15	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/747	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये ड्रेनेज चेंबर साफसफाई व दुरुस्त करणे.	४१५	८४२४५६.००	८४२५	१८० दिवस
16	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/748	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये सिंहगड कॉलेज रोड ड्रेनेज लाईन दुरुस्ती विषयक व इतर तदनुषंगिक कामे करणे.	४१५	८४२४८४.००	८४२५	१८० दिवस
17	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/749	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये मंगला रेसिडेन्सी वडगाव बु येथे रस्ता विकसित करणे	४१५	८४६२४३.००	८४६२	180
18	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/750	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये शरद चंद्रजी पवार ई-लर्निंग स्कूल येथे वॉचमेन कोठी व इतर तदनुषंगिक कामे करणे	१३५९	१६८८८२१.००	१६८८८	१८० दिवस
19	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/751	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये सनसिटी भाजी मंडई शौचालया वरती केअर टेकर खोली बांधणे	१३५९	१६९२२१२.००	१६९२२	१८० दिवस
20	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/752	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये नंदादीप सोसायटी येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे.	१३५९	१६८९९३३.००	१६८९९	१८० दिवस
21	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/753	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये महावीर नगर परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्ती व साफसफाई विषयक कामे करणे.	१३५९	१६८९९४५.००	१६८९९	१८० दिवस
22	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/754	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील स्वरूप कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे.	४१५	८४०९२१.००	८४०९	१८० दिवस
23	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/755	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील संतोष बेकरी ते आनंद नगर मारुती मंदिरापर्यंत रस्ता मिलिंग करून डांबरीकरण करणे.	४१५	८४१५९९.००	८४१६	१८० दिवस
24	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/756	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.२८ ड सरिता नगरी परिसरामध्ये स्टॅम्प कॉक्रीट करणे व फुटपाथ दुरुस्ती करणे.	१३५९	२११५८८१.००	२११५९	१८० दिवस
25	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/757	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.२८ ड आनंद विहार परिसरामध्ये स्टॅम्प कॉक्रीट करणे व फुटपाथ दुरुस्ती करणे.	१३५९	२११५६८२.००	२११५७	१८० दिवस
26	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/758	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये लक्ष्मी गंगा सोसायटी व सुंदर सहवास सोसायटी मधील अमिनिटी स्पेस विकसित करणे.	४१५	८४११५८.००	८४१२	१८० दिवस
27	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/759	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये शरद चंद्रजी पवार ई-लर्निंग स्कूल येथे सायन्स लॅब करणे	४१५	८४१२११.००	८४१२	१८० दिवस
28	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/760	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये सनसिटी रोड परिसर वडगाव बुद्रुक येथे धनुर्विद्या केंद्र स्पोर्ट्स नर्सरी करणे.	४१५	८४११२१.००	८४११	१८० दिवस
29	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/761	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये चैतन्य बागेत हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे.	४१५	८४७१६८.००	८४७२	१८० दिवस
30	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/762	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये शिवाली अपा परिसरात ड्रेनेज लाईन विकसित करणे.	४१५	८४२४७२.००	८४२५	१८० दिवस
31	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/763	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये गोसावी वस्ती वडगाव बुद्रुक परिसरात ड्रेनेज लाईन विषयक व इतर तदनुषंगिक कामे करणे.	४१५	८४२४७२.००	८४२५	१८० दिवस
32	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/764	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये जिजाऊ नगर वडगाव बुद्रुक परिसरात ड्रेनेज लाईन विषयक व इतर तदनुषंगिक कामे करणे.	४१५	८४२४५९.००	८४२५	१८० दिवस
33	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/765	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये रायगड नगर वडगाव बुद्रुक परिसरात ड्रेनेज लाईन विषयक व इतर तदनुषंगिक कामे करणे.	४१५	८४२४४७.००	८४२४	१८० दिवस
34	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/766	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये मंगला रेसिडेन्सी वडगाव बुद्रुक येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे.	४१५	८४२४८७.००	८४२५	१८० दिवस
35	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/767	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये स्वामी समर्थ निवास वडगाव बुद्रुक येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे.	४१५	८४२४४४.००	८४२४	१८० दिवस
36	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/768	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये कृष्णा रेसिडेन्सी वडगाव बुद्रुक येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे.	४१५	८४२४८४.००	८४२५	१८० दिवस
37	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/769	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये स्वामी समर्थ स्नेहा वडगाव बुद्रुक येथे ड्रेनेज लाईन विकसित करणे.	४१५	८४२४८४.००	८४२५	१८० दिवस
38	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/770	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये समर्थ नगर परिसरात ड्रेनेज लाईन विकसित करणे.	४१५	८४२२०४.००	८४२२	१८० दिवस
39	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/771	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये सूर्यनगरी सोसायटी जवळ जॉगिंग ट्रॅक विकसित करणे.	४१५	८४४५३७.००	८४४५	१८० दिवस
40	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/772	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये सूर्यनगरी सोसायटी जवळ मैदान विकसित करणे.	४१५	८४१३११.००	८४१३	१८० दिवस
41	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/773	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये कै. रुक्मिणीबाई विठ्ठलराव जाधव क्रीडा मैदान शेजारी वडगाव बु. येथे रस्ता डांबरी करण करणे	४१५	८४१६४०.००	८४१६	१८० दिवस
42	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/774	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये सिंहगड कॉलेज समोरील वडगाव बु. रस्ता डांबरीकरण करणे	४१५	८४०९४३.००	८४०९	१८० दिवस
43	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/775	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये श्री कृष्णा रेसिडेन्सी वडगाव बु येथे रस्ता विकसित करणे	४१५	८४६२४३.००	८४६२	१८० दिवस
44	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/776	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये श्री स्वामी समर्थ स्नेहा, वडगाव बु. येथे रस्ता विकसित करणे	४१५	८४६२४३.००	८४६२	१८० दिवस
45	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/777	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये चंद्रभागा ते शिवपुष्प चौक परिसरातील रस्ते विकसित करणे	४१५	८४१६४०.००	८४१६	१८० दिवस
46	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/778	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील साईनगर मधील साई मंदिर येथील ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे	४१५	८४२४८१.००	८४२५	१८० दिवस
47	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/779	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील प्रसाज ते स्वनार्क येथील रस्ता काँक्रिटीकरण करणे.	४१५	८४४९८४.००	८४५०	१८० दिवस
48	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/780	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील अमृता नगर मध्ये रस्ता काँक्रिटीकरण करणे.	४१५	८४५७६१.००	८४५८	१८० दिवस
49	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/781	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ अ मधील पोलीस चौकी ते स्वामी समर्थ मठा पर्यंत मिलिंग करून रस्ता विकसित करणे.	४१५	८४०९२०.००	८४०९	१८० दिवस
50	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/782	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये श्री स्वामी समर्थ निवास वडगाव बु. येथे रस्ता विकसित करणे	४१५	८४६५१०.००	८४६५	१८० दिवस
51	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/783	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये साई मंदिर जवळ साई नगर येथे रस्ता विकसित करणे	४१५	८४६२४३.००	८४६२	१८० दिवस
52	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/784	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये आनंदविहार फेज २ येथे रस्ता विकसित करणे	४१५	८४६२४३.००	८४६२	१८० दिवस
53	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/785	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३५ ब मध्ये सुंदर गार्डन परिसरात रस्ता डांबरी करण करणे	४१५	८४१६४०.००	८४१६	१८० दिवस
54	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/786	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. २८ड मधील हिंगणेखुर्द मनपा बहुउद्देशीय दवाखाना येथे विविध विकास कामे करणे	४१५	८४७४१८.००	८४७४	१८० दिवस
55	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/787	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये परिसरातील चेंबर रस्त्याच्या समपातळीत घेणे.	४१५	८४४८४७.००	८४४८	१८० दिवस
56	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/788	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये हिंगणे खुर्द येथील परिसरात राडारोडा उचलणे.	४१५	८४५३६६.००	८४५४	१८० दिवस
57	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/789	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३५ ब मध्ये पथ दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४०८३५.००	८४०८	१८० दिवस
58	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/790	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत उत्तमनगर व परिसरात थर्मोप्लास्ट, लेन मार्किंगची कामे करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४२५८३.००	८४२६	१८० दिवस

पुढे पहा

59	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/791	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत कोपरे येथील स्मशानभूमी दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४४७०२.००	८४४७	१८० दिवस
60	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/792	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत लक्ष्मी ग्रीन कौंटी कोंढवे धावडे व परिसरात रस्ते दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४१८९०.००	८४१९	१८० दिवस
61	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/793	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत उत्तमनगर व परिसरातील अस्तित्वातील रस्त्यावर दुरुस्ती व साईडपट्टीची कामे करणे.	४१५	८४१८९०.००	८४१९	१८० दिवस
62	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/794	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत वेलनेस मेडिकल देशमुखवाडी शिवणे व परिसरातील रस्ते डांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे.	४१५	८४२१२९.००	८४२१	१८० दिवस
63	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/795	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत शिवणे व परिसरात विविध ठिकाणी रस्ते दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४२९२५.००	८४२९	१८० दिवस
64	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/796	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत उत्तमनगर इंदिरा वसाहत येथे जुनी स्मशानभूमी मैदान व परिसरात पेल्टिंग ब्लॉक बसविणे व इतर दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४४५५५.००	८४४६	१८० दिवस
65	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/797	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत खडकवासला शाळा, मनपा कार्यालय व विविध इमारतीमध्ये दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४३१०६.००	८४३१	१८० दिवस
66	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/798	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत धायरी व परिसरातील रस्ते सुधारणा, पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४४७२४.००	८४४७	१८० दिवस
67	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/799	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत उत्तमनगर व परिसरात विविध ठिकाणी कॉक्रिटीकरण व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४६६३५.००	८४६६	१८० दिवस
68	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/800	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत स. नं.९७ शिवणे व परिसरात रस्ते कॉक्रिटीकरण व रस्ते दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४४९८४.००	८४५०	१८० दिवस
69	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/801	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत साई रेसीडेन्सी देशमुखवाडी, शिवणे व परिसरात कॉक्रिटीकरण व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४६७१५.००	८४६७	१८० दिवस
70	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/802	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत मासे आळी उत्तमनगर व परिसरातील रस्ते कॉक्रिटीकरण करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४५७६१.००	८४५८	१८० दिवस
71	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/803	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत लक्ष्मी निवास ते दत्त कृपा निवास शिवणे व परिसरात रस्ते कॉक्रिटीकरण करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४५३८६.००	८४५४	१८० दिवस
72	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/804	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत भैरवनाथ नगर कोंढवे धावडे व परिसरात कॉक्रिटीकरण व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४५७६१.००	८४५८	१८० दिवस
73	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/805	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत धायरी व परिसरात रस्ते कॉक्रिटीकरण करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४६७१५.००	८४६७	१८० दिवस
74	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/806	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत स.न. ९७ शिवणे साई स्वस्तिक रेसिडन्सी व परिसरात कॉक्रिट रस्ते दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे	४१५	८४४९८४.००	८४५०	१८० दिवस
75	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/807	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत उत्तमनगर मनपा प्राथमिक शाळा दुरुस्ती विषयक व रंगरंगोटी विषयक कामे करणे	४१५	८४६७२३.००	८४६७	१८० दिवस
76	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/808	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. ३३ क अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या नव्याने समाविष्ट गावातील मनपा शाळा कोपरे येथे दरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४३०३९.००	८४३०	१८० दिवस
77	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/809	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत शिवणे येथील स्मशानभूमी दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४०८९८.००	८४०९	१८० दिवस
78	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/810	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत शिवणे येथील मनपा शाळेची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४४५८६.००	८४४६	१८० दिवस
79	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/811	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र.३३ क अंतर्गत ड्रेनेज लाईन मधील गाळ काढणे व साफसफाई करणे. (जेटींग मशीनच्या सहाय्याने)	४१५	९९९९९३.००	१०००००	१८० दिवस
80	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/812	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्रमांक ३३ मध्ये खडकवासला, नांदेड, धायरी, शिवणे व इतर भागातील राडारोडा उचलणे विषयक काम करणे.	४१५	९९९६५६.००	९९९७	२४० दिवस
81	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/813	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. 33 मध्ये विविध ठिकाणी पेविंग ब्लॉक दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४६४८७.००	८४६५	२४० दिवस
82	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/814	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. 33 अंतर्गत खडकवासला, मुकाईनगर भागात रस्ते दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४४१७३.००	८४४२	२४० दिवस
83	PMC/ZONE-3/ SINHGAD/2026-27/815	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्रमांक ३३ मध्ये खडकवासला, नांदेड भागात ड्रेनेज लाईन दुरुस्ती विषयक काम करणे.	४१५	८४७४४६.००	८४७४	२४० दिवस
84	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/816	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ क मधील जनता वसाहत येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे	७६९	१२७११६४.००	१२७१२	१२० दिवस
85	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/817	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. २८अ मधील वडाचा गणपती येथील परिसराचे सुशोभिकरण करणे.	४१५	८४७४५३.००	८४७५	१२० दिवस
86	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/818	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील जनता वसाहत गल्ली क्रमांक ३९ डोंगर भागातील सुरक्षाभिंत व खराब कॉक्रिट दुरुस्ती करणे	७६९	१२७१००३.००	१२७१०	१२० दिवस
87	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/819	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील डोंगरावरील वाघजाई मातेच्या अलीकडील रोड कॉक्रिट व दुरुस्ती करणे	४१५	८४७४२९.००	८४७४	१२० दिवस
88	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/820	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील जनता वसाहत विविध ठिकाणी कॉक्रिटीकरण व दुरुस्ती विषयक कामे करणे	४१५	८४७३९५.००	८४७४	१२० दिवस
89	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/821	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८अ मधील शाहू नगर गणेशमळा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे	४१५	८४६७००.००	८४६७	१२० दिवस
90	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/822	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८अ मधील दत्तवाडी स्वामी मंदिराजवळील ड्रेनेज लाईन बदलणे	४१५	८४७३९२.००	८४७४	१२० दिवस
91	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/823	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८अ मधील पु.ल. देशपांडे नाल्यातील भिंत बांधणे व इतर कामे करणे	४१५	८४७३९७.००	८४७४	१२० दिवस
92	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/824	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	"प्र.क्र. २८अ मधील जुन्या व्यासांची ड्रेनेज लाईन काढून नवीन मोठ्या व्यासांची ड्रेनेज लाईन टाकणे"	४१५	८४७३९०.००	८४७४	१२० दिवस
93	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/825	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८अ मधील गणेशमळा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन विषयक कामे करणे	४१५	८४७३९०.००	८४७४	१२० दिवस
94	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/826	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्रभाग क्र. २८अ मधील सिंहगडरोड वरील गणपती मंदिर परिसरात सुशोभिकरण करणे.	४१५	८४७४३५.००	८४७४	१२० दिवस
95	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/827	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	"प्रभाग क्र. २८अ मधील जनता वसाहत येथील आनंदमठ परिसरातील सुशोभिकरण करणे."	४१५	८४७३९५.००	८४७४	१२० दिवस
96	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/828	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ब हिंगणे तरडे कॉलनी परिसरात विविध विकास कामे करणे	४१५	८४७३३४.००	८४७३	१२० दिवस
97	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/829	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ब दांडेकर पूल, दत्तवाडी परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे	४१५	८४७४१७.००	८४७४	१२० दिवस
98	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/830	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ब जनता वसाहत दत्त मंदिर, विठ्ठल मंदिर ड्रेनेज विषयक कामे करणे	४१५	८४७२८०.००	८४७३	१२० दिवस
99	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/831	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ब जनता वसाहत जयभवानी नगर ड्रेनेज विषयक कामे करणे	४१५	८४७४१४.००	८४७४	१२० दिवस
100	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/832	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८ब जनता वसाहत परिसरामध्ये सुधारणा विषयक कामे करणे	४१५	८४७४०१.००	८४७४	१२० दिवस
101	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/833	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र.28 ब मध्ये विविध ठिकाणी अंगणवाडी दुरुस्तीविषयक कामे करणे	४१५	८४७३९१.००	८४७४	१२० दिवस
102	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/834	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र.28 ब मध्ये अंगणवाडीमध्ये विविध विकासकामे करणे	४१५	८४७४४४.००	८४७४	१२० दिवस
103	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/835	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील जनता वसाहत गल्ली क्रमांक १४ डोंगरावर समाज मंदिर दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे	७६९	१२७११६१.००	१२७१२	१२० दिवस
104	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/836	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील जनता वसाहत येथील विविध ठिकाणचे सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे	७६९	१२७११८२.००	१२७१२	१२० दिवस
105	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/837	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील जनता वसाहत दत्त मंदिर समाज मंदिर दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे	७६९	१२७११३९.००	१२७११	१२० दिवस
106	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/838	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील रमाबाई रानडे सभागृह उर्वरित कामे करणे	७६९	१२७१०४७.००	१२७१०	१२० दिवस
107	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/839	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८क मधील जनता वसाहत प्र. सूचना फलक लावणे	१३५९	१६९४८५९.००	१६९४९	१२० दिवस
108	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/840	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र. २८अ मधील कांचन हाईटस, कोकणे वस्ती परिसर कॉक्रिटीकरण करणे	७६९	१२७११०८.००	१२७११	१२० दिवस
109	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/841	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र.28 अ मध्ये बहुउद्देशीय मनपा दवाखाना विश्वांतनगर-हिंगणेखुर्द इमारत येथे आरोग्य केंद्र उभारणे	७६९	१२७११४०.००	१२७११	१२० दिवस
110	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/842	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र.28 मध्ये आनंद रिठे यांच्या ऑफिससमोरील रस्ता विकसित करणे	१३५९	२११६८६१.००	२११८६	१२० दिवस
111	PMC/ZONE3/2026-27/ SINHGAD/843	सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालय	प्र.क्र.28 अ मध्ये कोकणे वसाहती मागील सिमाभिंत बांधणे	१३५९	१६९४८९४.००	१६९४९	१२० दिवस
112	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/536	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	वारजे कर्वेनगर मधील आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३६२८.००	४२३६	5 महिने
113	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/537	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 29 मधील कुलश्री सोसायटी, वेदांत नगरी व इतर परिसरात विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३६६६.००	४२३७	5 महिने
114	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/538	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 29 मधील ब्रम्हचैतन्य, तपोधाम, आनंद कॉलनी येथे प्रकाश व्यवस्था सुधारणा कामे करणे	४१५	४२३६९५.००	४२३७	5 महिने
115	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/539	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 29 मधील कर्वेनगर कॅनॉल रस्ता परिसरात विविध विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३७२६.००	४२३७	5 महिने
116	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/540	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 30 मधील दत्तदिगंबर सोसायटी, इंगळे नगर येथे प्रकाश व्यवस्थेची कामे करणे	४१५	४२३६८०.००	४२३७	5 महिने

पुढे पहा


महात्मा फुले जन्मद्विशताब्दी निमित्त २७ नोव्हेंबरला पुणे महापालिकेत अभिरूप सभा

■ पुणे (दै. संध्या)

■ उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या तीन प्रस्तावांना पक्षनेते सभेची मंजुरी; वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त आणि चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि क्रीडा विषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांसंदर्भात उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी मांडलेल्या तीन महत्त्वपूर्ण प्रस्तावांना पक्षनेते सभेने मंजुरी दिली आहे. महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला, शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहात विशेष अभिरूप सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे ऐतिहासिक व वैचारिक मार्गदर्शन' या संकल्पनेवर ही सभा आधारित असेल. या अभिरूप सभेत महात्मा फुले यांनी तत्कालीन काळात सभागृहात मांडलेले विचार, सादर केलेले ठराव आणि सामाजिक सुधारणांसाठी केलेले कार्य त्यांच्या भूमिकेतून सादर करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा आणि ऐतिहासिक योगदानाचा परिचय नव्या पिढीला करून देणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

याशिवाय, पुणे महानगरपालिकेच्या दैनंदिन कार्यक्रमांमध्ये तसेच अधिकृत लेटरहेडवर महात्मा ज्योतिराव फुले यांचा विशेष लोगो वापरण्यासही मान्यता देण्यात आली आहे. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी हे तिन्ही प्रस्ताव पक्षनेते सभेपुढे मांडले होते. त्यांना सभेने मंजुरी दिल्याने महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त महापालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महात्मा फुले यांनी मांडलेले सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक परिवर्तनाचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी या उपक्रमांचा उपयोग होणार असल्याचे उपमहापौर कार्यालयाकडून सांगण्यात आले.



बाइक टॅक्सीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालाचे रॅपिडोकडून स्वागत

या श्रेणीसाठी निर्णायक क्षण आणि राज्यस्तरीय नियमनाच्या पुढील टप्प्याची सुरुवात

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतातील सर्वात मोठा आणि सर्वात परवडणारा वन-स्टॉप मोबिलिटी प्लॅटफॉर्म असलेल्या रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडने (Roppen Transportation Services Private Limited - रॅपिडो) आज कर्नाटक बाइक टॅक्सी प्रकरणातील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. हा निर्णय भारतातील बाइक टॅक्सी श्रेणीसाठी ऐतिहासिक क्षण असल्याचे कंपनीने म्हटले आहे. लाखो प्रवासी आणि कॅप्टन्सना सेवा देणाऱ्या या श्रेणीसाठी हा निकाल एक मोठे पाऊल आहे. त्याचबरोबर, राज्यांना स्पष्ट आणि व्यवहार्य बाइक टॅक्सी धोरणे तयार करण्यासाठी यामुळे भक्कम पाया मिळणार आहे. बाइक टॅक्सी प्रकरणात कर्नाटक राज्याने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. हा निकाल भारतातील बाइक टॅक्सी श्रेणीसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. गेल्या अनेक वर्षांत ही श्रेणी उभी करण्यात रॅपिडोने आघाडीची भूमिका बजावली आहे. कमी अंतराच्या प्रवासासाठी तसेच फर्स्ट- आणि लास्ट-माइल प्रवासासाठी बाइक टॅक्सी हा एक महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे आला आहे. त्याचबरोबर, यामुळे लाखो कॅप्टन्सना कमाईच्या लवचीक संधी मिळाल्या असून, देशभरातील प्रवाशांना प्रवासाचे अधिक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

रॅपिडोचे सह-संस्थापक पवन गुंटुपल्ली म्हणाले, "माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. यामुळे कर्नाटकातील बाइक टॅक्सी श्रेणीबाबत आवश्यक स्पष्टता आली असून, भारतातील या क्षेत्रासाठी हा ऐतिहासिक क्षण आहे. गेल्या काही वर्षांत बाइक टॅक्सींनी आपले महत्त्व सिद्ध केले आहे. गर्दीच्या शहरांमध्ये प्रवाशांना सहज ये-जा करण्यास मदत करून, फर्स्ट- आणि लास्ट-माइल कनेक्टिव्हिटी मजबूत करून आणि कॅप्टन्ससाठी कमाईच्या लवचीक संधी निर्माण करून त्यांनी हे दाखवून दिले आहे. प्रत्यक्ष जमिनीवर ही श्रेणी आधीच बजावत असलेल्या भूमिकेला हा निकाल मान्यता देतो आणि मोबिलिटी इकोसिस्टममध्ये तिच्या सातत्यपूर्ण वाढीसाठी आणि एकात्मतेसाठी भक्कम पाया देतो."

ते पुढे म्हणाले, "रॅपिडोसाठी हा केवळ कायदेशीर निकाल नाही. आम्ही सातत्याने ज्या गोष्टीवर विश्वास ठेवत आलो आहोत, त्याला मिळालेली ही पुष्टी आहे. लोक प्रत्यक्षात कसा प्रवास करतात, हे लक्षात घेऊन तयार केलेल्या मोबिलिटी सोल्युशन्सची भारताला गरज आहे. दुचाकी ही देशातील सर्वाधिक लोकांकडे असलेली आणि सहज उपलब्ध होणारी वाहने आहेत. लोकांना त्यांचा उत्पादक वापर करता आला, तर प्रवासी, कॅप्टन्स आणि शहरे, सर्वांसाठीच अर्थपूर्ण मूल्य निर्माण होऊ शकते. ही श्रेणी सुरक्षित, जबाबदार, नियमनाखालील आणि मोठ्या प्रमाणावरील अशा पुढील टप्प्यावर नेण्यासाठी कर्नाटक सरकारसोबत काम करण्यास आम्ही उत्सुक आहोत."

भारताच्या शहरी वाहतूक इकोसिस्टममध्ये बाइक टॅक्सी हा एक स्वतंत्र स्तर म्हणून पुढे आला आहे, विशेषतः एकट्याने करायच्या कमी अंतराच्या प्रवासासाठी आणि फर्स्ट- व लास्ट-माइल कनेक्टिव्हिटीसाठी. बंगळुरूसारख्या शहरांमध्ये प्रवाशांना वाहतूक कोंडी, विस्तारणारे मेट्रो नेटवर्क आणि दूरदूर पसरलेली रोजगार केंद्रे यांतून मार्ग काढावा लागतो. अशा ठिकाणी बाइक टॅक्सी बस, मेट्रो, ऑटो आणि कॅब यांच्याशी स्पर्धा करण्याऐवजी त्यांना पूरक ठरू शकतात. कॅप्टन्ससाठीही हे मॉडेल मोबिलिटी अर्थव्यवस्थेत सहभागी होणे सोपे करते, कारण यामुळे व्यक्तींना आपल्याकडे आधीच असू शकणाऱ्या दुचाकीतून उत्पन्न मिळवता येते. कर्नाटकातील कायदेशीर स्थिती आता अधिक स्पष्ट झाल्यामुळे, पुढील टप्प्यात ही श्रेणी जबाबदारीने पुढे नेण्यावर भर दिला गेला पाहिजे, असे रॅपिडोचे मत आहे. भारताच्या मल्टिमॉडल वाहतूक इकोसिस्टमचा महत्त्वाचा भाग बनण्याची क्षमता असलेल्या या श्रेणीच्या वाढीसाठी रॅपिडो आपले तंत्रज्ञान, कार्यान्वयनाचा अनुभव आणि सुरक्षा यंत्रणा यांच्या माध्यमातून योगदान देत राहील.


रत्नागिरी जेट्सने सिल्व्हर बर्च व्हिजन स्पोर्ट्स अकॅडमीसोबत सुरू केली पहिली क्रिकेट अकादमी

महाराष्ट्रातील क्रिकेटपटूंच्या पुढील पिढीसाठी उभारणार प्रगतीचा मार्ग

■ रत्नागिरी जेट्सच्या तळागाळातील क्रिकेट विकास कार्यक्रमाची ही पहिली पायरी असून, महाराष्ट्रातील प्रमुख भागांमध्ये अकादमींचे जाळे विस्तारण्याची योजना आहे

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) मध्ये दोन वेळा विजेतेपद पटकावण्याच्या यशानंतर, रत्नागिरी जेट्सने पुण्यातील वडगाव बुद्रुक येथे सिल्व्हर बर्च व्हिजन स्पोर्ट्स अकॅडमीच्या सहकार्याने आपली पहिली अधिकृत क्रिकेट अकादमी सुरू करण्याची घोषणा केली आहे. उदयोन्मुख प्रतिभेला तळागाळातील क्रिकेटपासून व्यावसायिक क्रिकेटपर्यंत प्रगती करण्यासाठी सुसंरचित मार्ग उपलब्ध करून देत महाराष्ट्राची क्रिकेट परिसंस्था बळकट करण्याच्या फ्रँचायझीच्या बांधिलकीतील हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. फ्रँचायझीच्या प्रतिभा विकासाच्या प्रयत्नांना मिळालेल्या वाढत्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर ही अकादमी सुरू करण्यात येत आहे. रत्नागिरी जेट्सने अलीकडेच १६ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील गटांसाठी प्रतिभा निवड चाचण्या घेतल्या, ज्यात ७०० हून अधिक इच्छुक क्रिकेटपटूंनी सहभाग घेतला. ही नवी अकादमी या बांधिलकीला वर्षभर चालणाऱ्या विकास कार्यक्रमाचे स्वरूप देईल. तसेच, महाराष्ट्रातील प्रमुख भागांमध्ये आणखी अकादमी स्थापन करण्याचीही योजना आहे. गेल्या काही वर्षांत रत्नागिरी जेट्सने जेट्स क्लबच्या माध्यमातून व्यावसायिक टी-२० स्पर्धांच्या पलीकडे आपला विस्तार केला आहे. हा क्लब गेली तीन वर्षे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) अधिकृत स्पर्धांमध्ये खेळत आहे. २०२५ मध्ये महिला महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये (डब्ल्यूएमपीएल) संघ उतरवून फ्रँचायझीने महिला क्रिकेटप्रतीची बांधिलकीही अधिक दृढ केली. या संघाचे नेतृत्व स्मृती मानधना करतात, ज्या सध्या भारतीय महिला राष्ट्रीय संघाच्या कर्णधार आहेत. रत्नागिरी जेट्स-सिल्व्हर बर्च व्हिजन क्रिकेट अकादमीची रचना तळागाळातील प्रतिभा आणि व्यावसायिक क्रिकेट यांच्यातील दरी कमी करण्यासाठी करण्यात आली आहे. सात वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या खेळाडूंसाठी असलेल्या या सुसंरचित विकास कार्यक्रमात १४ वर्षांखालील, १६ वर्षांखालील, १९ वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील गटांचा समावेश आहे. हा कार्यक्रम खेळाडूंना वरिष्ठ क्लब क्रिकेट, फ्रँचायझीचे पुरुष आणि महिला संघ तसेच उच्च दर्जाच्या टी-२० लीगपर्यंत प्रगती करण्यासाठी पाठबळ देईल.



राजन नवानी, अध्यक्ष, जेटसिंथेसिस आणि सह-मालक, रत्नागिरी जेट्स, म्हणाले: "चॅम्पियन एका रात्रीत घडत नाहीत; गुणवत्तेची ओळख पटवणाऱ्या, क्षमता जोपासणाऱ्या आणि उत्कृष्टतेकडे नेणारे मार्ग निर्माण करणाऱ्या परिसंस्थांमधून ते घडतात. रत्नागिरी जेट्सच्या माध्यमातून भारतीय क्रिकेटचा हा पाया अधिक मजबूत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तळागाळातील प्रतिभेचे रूपांतर खेळाचे भविष्य घडवू शकणाऱ्या संधींमध्ये करण्याचे आमचे ध्येय आहे." राकेश नवानी, सह-मालक, रत्नागिरी जेट्स, म्हणाले: "रत्नागिरी जेट्सबद्दलची आमची दृष्टी केवळ अजिंक्यपदांसाठी स्पर्धा करण्यापुरती मर्यादित नाही. तरुण खेळाडूंना शिकण्याच्या, विकसित होण्याच्या आणि आपली क्षमता साकारण्याच्या संधी उपलब्ध करून महाराष्ट्राच्या क्रिकेटच्या भवितव्यासाठी अर्थपूर्ण योगदान देणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. अलीकडील प्रतिभा निवड चाचण्यांना मिळालेल्या प्रतिसादातून राज्यभरातील क्रिकेट प्रतिभेची समृद्धी अधोरेखित झाली आहे. या अकादमीद्वारे आणि नियोजित विस्ताराद्वारे, तळागाळातील क्रिकेटची आवड आणि खेळाच्या सर्वोच्च स्तरावरील संधी यांना जोडणारा अधिक सुसंरचित मार्ग निर्माण करण्याचा आमचा मानस आहे."

महिंद्र लुल्ला, सह-मालक, रत्नागिरी जेट्स, म्हणाले: "महाराष्ट्रात क्रिकेट प्रतिभेची कधीच कमतरता नव्हती; तरुण खेळाडूंना अनेकदा गरज असते ती संधीचे दार उघडण्याची. आमचा महिला संघ आणि जेट्स क्लब यांनी उदयोन्मुख क्रिकेटपटूंना प्रत्यक्ष संधी आणि व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या अकादमीच्या माध्यमातून ही बांधिलकी आणखी पुढे नेताना आम्हाला आनंद होत आहे. सुसंरचित प्रशिक्षण, दर्जेदार सुविधा आणि विकास कार्यक्रमांच्या साहाय्याने, राज्यभरातील अधिकाधिक प्रतिभावान खेळाडूंसाठी हे संधीचे दार लवकर उघडण्याची आम्हाला आशा आहे." रत्नागिरी जेट्सच्या व्यापक प्रतिभा विकास परिसंस्थेतून घडलेले खेळाडू आधीच प्रमुख देशांतर्गत आणि फ्रँचायझी क्रिकेट संघांमध्ये स्थान मिळवत आहेत. यात भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा उपकर्णधार आणि महाराष्ट्राच्या रणजी ट्रॉफी संघातील खेळाडू किरण चोरमले; महिला प्रीमियर लीगमध्ये (डब्ल्यूपीएल) रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूसाठी आणि डब्ल्यूएमपीएलमध्ये रत्नागिरी जेट्ससाठी उल्लेखनीय कामगिरी करणारी गौतमी नाईक; तसेच महाराष्ट्राच्या रणजी ट्रॉफी आणि वरिष्ठ देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्थान मिळवलेले प्रदीप दाढे, अथर्व धर्माधिकारी, दिव्यांग हिंगणेकर, निखिल नाईक आणि निकित धुमाळ यांचा समावेश आहे. रत्नागिरी जेट्सच्या पहिल्या तीन एमपीएल हंगामांत संघाचे नेतृत्व करणाऱ्या अझीम काझी यांनीही रणजी ट्रॉफी, विजय हजारे ट्रॉफी आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी या स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. या अकादमीमध्ये CoachED या जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षित, स्तर १ ते स्तर ४ प्रमाणपत्रेधारक पात्र प्रशिक्षक मार्गदर्शन करतील. सुविधांमध्ये मैदानी आणि इनडोअर सराव नेट्स, टी-२० क्रिकेटसाठी विशेष उच्च दर्जाचे प्रशिक्षण तसेच निवडक गुणवंत खेळाडूंसाठी शिष्यवृत्ती कार्यक्रमाचा समावेश असेल.

117	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/541	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 30 मधील सम्राट अशोक विद्यालय येथे विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३६६७.००	४२३७	5 महिने
118	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/542	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 29 मधील बिंदुमाधव ठाकरे दवाखान्यामध्ये वायरिंगची कामे करणे	४१५	४२३७१५.००	४२३७	5 महिने
119	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/543	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 29 मधील दीनदयाळ उपाध्याय शाळेमध्ये विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३६६४.००	४२३७	5 महिने
120	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/544	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र 30 मधील पुणे मनपाच्या विविध शाळा, इमारती, व आरोग्यवर्धिनी येथे विद्युत विषयक वायरिंगची कामे करणे करणे	४१५	४२३७०८.००	४२३७	5 महिने
121	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/545	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र 30 मधील कॅनॉल रस्ता व लगतच्या परिसरात प्रकाश व्यवस्था सुधारणा कामे करणे	४१५	४२३७१०.००	४२३७	5 महिने
122	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/546	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र 30 मधील आंबडेकर चौक परिसरातील रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३६५६.००	४२३७	5 महिने
123	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/547	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र 30 मधील पाणंद रस्ता व लगतच्या गल्ल्यांमध्ये पथदिवे सुधारणा कामे करणे	४१५	४२३७१४.००	४२३७	5 महिने
124	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/548	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र 30 मधील पुणे मनपाच्या विविध इमारतीमध्ये वायरिंग व इतर विद्युत विषयक कामे करणे	४१५	४२३६१३.००	४२३६	5 महिने
125	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/549	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र 29 मधील कॅनॉल रोडवर पोल उभारून प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणे	४१५	४२३६५६.००	४२३७	5 महिने
126	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/550	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र. 29 मधील पुणे मनपाच्या विविध इमारती, आरोग्यवर्धिनी केंद्र येथे वायरिंग विषयक कामे करणे	४१५	४२३६११.००	४२३६	5 महिने
127	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/551	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्रभाग क्र.29 ड मध्ये, विविध ठिकाणी भिंतीवर स्वच्छ अभियान माहिमेअंतर्गत पाणी रोधक व सहज स्वच्छ होणाऱ्या लेपामह असणारी मुद्रीते वापरून जनजागृती करणे	४१५	८४७२००.००	८४७२	5 महिने
128	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/552	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्र.क्र. ३० ड मधील कर्वेनगर स.न. ९ येथील शाहू उद्यानामध्ये लहान मुलांची खेळणी बसविणे.	४१५	८४४२२५.००	८४४२	5 महिने
129	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/553	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्र. क्र.30 क मध्ये प्रभागातील ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे	४१५	८४४७३५.००	८४४७	5 महिने
130	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/554	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्र.क्र. ३० ब हिंगणे होम कॉलनी, बिजली तालीम, वडारवस्ती व विविध ठिकाणी शौचालय दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४४९२७.००	८४४९	5 महिने
131	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/555	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्र.क्र. ३० ब हिंगणे होम कॉलनी, मावळे आळी व विविध ठिकाणी शौचालय दुरुस्ती विषयक कामे करणे.	४१५	८४४९२७.००	८४४९	5 महिने
132	PMC/ZONE-3/2026-27/ WARJE-KARVENAGAR/556	वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय	प्र. क्र.32 मधील गवनी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे.	४१५	४२०८५३.००	४२०९	5 महिने

1) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (प्रत्येक कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती नुसार ठेकेदाराने सादर करावयाच्या कागदपत्रांवर ठेकेदाराने स्वाक्षरी करुन अ पाकिटात अपलोड करावयाचे आहे.

2) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

3) ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपुर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा Contact No :- ०१२०-४२००४६२/०१२०-४००१००२/९१-८८२६२४६५९३

4) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

5) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ (वि.) / ३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

सही/-
उप आयुक्त परिमंडळ क्र. ३
पुणे महानगरपालिका, पुणे

जाहिरात क्र.-५१-DC-३-२०२६-२७

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



चेन्नईमध्ये इमर्सिव्ह लर्निंग सेंटरचे अनावरण

चेन्नई: दैनिक संध्या

कॉग्निझंट (NASDAQ: CTSH), एआय बिल्डर तसेच तंत्रज्ञान सेवा पुरवठादाराने आज चेन्नईतील सिरूसेरी कॅम्पसमध्ये कॉग्निझंट इमर्सिव्ह लर्निंग सेंटर (सीआयएलसी) च्या पहिल्या टप्प्याचे अनावरण केले. हे जागतिक स्तरावर ग्राहकांसाठी एआय-संचालित प्रभाव चालविण्यासाठी सुसज्ज प्रतिभा विकसित करण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेला बळकटी देते. भविष्यासाठी सज्ज (फ्यूचर-रेडी) शिकण्याचा अनुभव देण्यासाठी तयार केलेली सीआयएलसी समकालीन कार्यस्थळाची रचना, डिजिटल शिक्षण पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षक-नेतृत्वाखालील शिक्षण, सहकार्य आणि कल्पनांना समर्थन देणारे लवचिक वातावरण एकत्र आणते. अंदाजे 1,65,000 चौरस फुटांवर पसरलेल्या या सुविधेमध्ये 1,822 शिकण्याच्या जागांसह 58 वर्ग, 208 बहुउद्देशीय जागा (मल्टीपर्पज सीटस्), सहयोगी जागा (कोलॅबरेटीव्ह स्पेस), बैठकीची खोली (मीटिंग रूम), एक वर्क कॅफे, ग्रंथालय आणि लवचिक टाऊन हॉल जागा आहेत. सीआयएलसी'चा टप्प्याटप्प्याने विस्तार केला जाईल. कॉग्निझंट इंडियाचे अध्यक्ष (ग्लोबल ऑपरेशन्स) तसेच अध्यक्ष आणि मॅनेजिंग डायरेक्टर राजेश वारियर म्हणाले, "एआय बिल्डर म्हणून, आमचे लक्ष व्यवसायात बदल घडवून आणण्यासाठी एआयचा वापर करण्यावर तसेच आमच्या सहकाऱ्यांना त्या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यावर आहे. "कॉग्निझंट इमर्सिव्ह लर्निंग सेंटर आमच्या ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण, एआय-सक्षम उपाय तयार करताना आमचे कार्यबल शिकू आणि सहयोग करू शकतील अशा जागा तयार करण्यासाठी आमची निरंतर गुंतवणूक प्रतिबिंबित करते." "तंत्रज्ञानातील वेगवान प्रगतीमुळे निरंतर शिक्षणाला पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. कॉग्निझंटचे चीफ पीपल ऑफिसर कॅथी डायझ म्हणाल्या की, कार्यबल परिवर्तनातील एक नेता म्हणून आम्ही आमच्या सहकाऱ्यांना नवीन कौशल्ये तयार करण्यासाठी, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत वाढ करण्यासाठी संधी निर्माण करण्यासाठी लक्षणीय गुंतवणूक करत आहोत. "कॉग्निझंट इमर्सिव्ह लर्निंग सेंटर उद्देशाने तयार केलेल्या वातावरणात शिकणे आणि सहकार्य एकत्र आणते, ज्यामुळे आमच्या सहकाऱ्यांना एआय-नेतृत्वाखालील भविष्यात भरभराटीची क्षमता विकसित करण्यास मदत होते."एआय गुंतवणुकीचे उद्योजकीय परिणामांमध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक मानवी क्षमता निर्माण करून कॉग्निझंट आपले फ्रंटियर वर्कफोर्स मॉडेल पुढे नेत आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, आपले फ्रंटियर-प्रमाणित कार्यबल 5,000 फ्रंटियर प्रमाणित अभियंते आणि 10,000 फ्रंटियर बिझनेस ऑपरेटर्सपर्यंत वाढवण्याची वचनबद्धता असल्याची घोषणा कंपनीने केली. बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली-एनसीआर, गिफ्ट सिटी, हैदराबाद, इंदूर, कोची, कोलकाता, मंगळुरू, मुंबई, पुणे आणि विशाखापट्टणम येथे कॉग्निझंटची उपस्थिती आहे.

एअरटेलने सादर केला ट्रॅव्हल वीक

चेन्नई: दैनिक संध्या

सणासुदीच्या आणि हिवाळी प्रवासाच्या हंगामाआधी एअरटेल ट्रॅव्हल वीक सुरू करत आहे. हा 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर 2026 या कालावधीत एअरटेल ॲपवर चालेल, आणि यात इंटरनॅशनल रोमिंग, व्हिसा मदत आणि फॉरेक्स असे फायदे एकाच प्लॅटफॉर्मवर मिळतील. एअरटेल ट्रॅव्हल वीकचे मुख्य आकर्षण म्हणजे इंटरनॅशनल रोमिंग पॅकवर 10% सूट, जी प्रीपेड आणि पोस्टपेड, प्रत्येकी 1,000 वापरकर्त्यांना मिळेल. ग्राहक आपला सर्वात क्रिएटिव्ह आउट-ऑफ-ऑफिस ईमेल सबमिट करून आउट ऑफ ऑफिस कॉन्टेस्ट मध्ये सहभागी होऊ शकतात आणि सर्व खर्च भरलेली इंटरनॅशनल ट्रिप जिंकण्याची संधी मिळवू शकतात. दोन भाग्यवान विजेत्यांना त्यांची स्वप्नातील सुट्टी प्रत्यक्षात उतरवण्याची संधी मिळेल. व्हिसासाठी अर्ज करणाऱ्या ग्राहकांना पात्र आशियाई ठिकाणांसाठी ॲटलिसमार्फत त्यांच्या पुढील व्हिसा अर्जावर 100% सूट, ₹4,000 पर्यंत, मिळू शकते. प्रवासातील पैशांसाठी ग्राहकांना झिरो मार्कअप आणि मोफत डिलिव्हरीसह नियो मल्टीकरन्सी कार्ड मिळू शकते. तसेच ते खास दरांत नियो फॉरेक्स कॅशची घरपोच डिलिव्हरीही घेऊ शकतात, ज्यामुळे प्रवासापूर्वी परदेशी चलनाची व्यवस्था करणे सोपे होते. एअरटेलने वैयक्तिक प्रवास नियोजन देण्यासाठी ब्लूइड पासपोर्ट्स सोबत भागीदारीही केली आहे. पाच भाग्यवान ग्राहकांना वन-ऑन-वन ऑनलाइन सल्लामसलत मिळेल, ज्यात ब्लूइड पासपोर्ट्सचे प्रवास तज्ज्ञ त्यांच्या प्रवासाच्या योजना आणि आवडीनिवडींनुसार प्रवासाचा आराखडा तयार करण्यात मदत करतील. एअरटेल ग्राहकांना खास प्रवास फायदेही मिळतात. यात 250 ग्राहकांसाठी खास मर्चंडाइजसह कॉन्डे नास्ट ट्रॅव्हलर वार्षिक सबस्क्रिप्शन, आणि सर्व एअरटेल ग्राहकांसाठी निवडक 10 सिटी गाइड्सचा मोफत ॲक्सेस यांचा समावेश आहे. ₹500 चे ॲमेझॉन व्हाउचर्स 500 भाग्यवान एअरटेल ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. एअरटेल ट्रॅव्हल वीक एअरटेल ॲपवर 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर 2026 या कालावधीत चालेल.

चेन्नईमध्ये इमर्सिव्ह लर्निंग सेंटरचे अनावरण

चेन्नई: दैनिक संध्या

कॉग्निझंट (NASDAQ: CTSH), एआय बिल्डर तसेच तंत्रज्ञान सेवा पुरवठादाराने आज चेन्नईतील सिरूसेरी कॅम्पसमध्ये कॉग्निझंट इमर्सिव्ह लर्निंग सेंटर (सीआयएलसी) च्या पहिल्या टप्प्याचे अनावरण केले. हे जागतिक स्तरावर ग्राहकांसाठी एआय-संचालित प्रभाव चालविण्यासाठी सुसज्ज प्रतिभा विकसित करण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेला बळकटी देते. भविष्यासाठी सज्ज (फ्यूचर-रेडी) शिकण्याचा अनुभव देण्यासाठी तयार केलेली सीआयएलसी समकालीन कार्यस्थळाची रचना, डिजिटल शिक्षण पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षक-नेतृत्वाखालील शिक्षण, सहकार्य आणि कल्पनांना समर्थन देणारे लवचिक वातावरण एकत्र आणते. अंदाजे 1,65,000 चौरस फुटांवर पसरलेल्या या सुविधेमध्ये 1,822 शिकण्या

'आमची अहिराणी तुमच्या तोंडून छान वाटते!'

मुंबई: दैनिक संध्या

महाराष्ट्राच्या विविध भागांतील भाषा, बोली आणि संस्कृती यांचं वैविध्य आपल्या मायबोलीला अधिक समृद्ध करतं. खानदेशातील अहिराणी, बंजारा आणि मराठी अशा विविध भाषांच्या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या प्राथमिक शाळेच्या शिक्षिका वैशाली नांद्रे यांनी 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर अहिराणी भाषेत बोलण्याचा आग्रह करत माधुरी दीक्षितशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी माधुरीच्या व्यक्तिमत्त्वाचं, तिच्या अभिनयाचं, नृत्याचं आणि सर्वसामान्य स्पर्धकांशी संवाद साधण्याच्या तिच्या सहज स्वभावाचं वैशाली यांनी भरभरून कौतुक केलं. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका असलेल्या वैशाली नांद्रे यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक वैविध्याविषयी सांगताना खानदेशातील अहिराणी भाषेचा उल्लेख केला.

नाशिक फाटा-खेड आठपदरी 'एलिव्हेटेड कॉरिडॉर' भूसंपादन पूर्ण!

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यानंतर एनएचएआयचा अहवाल

■ पिंपरी (दै. संध्या)

पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड (राजगुरुनगर) या आठपदरी उन्नत मार्गासाठी आवश्यक संपूर्ण जमिनीचा कागदोपत्री ताबा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) मिळाला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रस्तरावर प्रकल्पाला चालना मिळाली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने भूसंपादन आणि आर्थिक बाबींमध्ये सहकार्य केले. भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी मागविलेल्या अहवालात एनएचएआयने निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्याचे आणि २८ ऑक्टोबर २०२६ रोजी 'लेटर ऑफ अवॉर्ड' जारी केल्याचे स्पष्ट केले आहे.

भोसरी-चाकण औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक कोंडी, कामगारांची दैनंदिन ये-जा आणि मालवाहतुकीतील अडचणी लक्षात घेऊन आमदार लांडगे यांनी १४ ऑक्टोबर रोजी एनएचएआयला पत्र दिले होते. भूसंपादन, निविदा, राज्य शासनाचे आर्थिक सहकार्य आणि पुढील कामांचे वेळापत्रक याबाबत त्यांनी सविस्तर माहिती मागविली होती. त्या अनुषंगाने एनएचएआयच्या पुणे प्रकल्प कार्यालयाने ४ नोव्हेंबर रोजी मुद्देनिहाय अहवाल तयार केला.

एनएचएआयच्या अहवालानुसार, प्रकल्पासाठी यापूर्वी ९३ टक्के जमीन उपलब्ध होती. प्रवेश आणि निर्गमन रॅम्पसाठी आवश्यक उर्वरित १०.६९ हेक्टर जमिनीच्या संपादनाला पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून गती देण्यात आली. पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक संपूर्ण जमिनीचा कागदोपत्री ताबा एनएचएआयकडे सुपूर्द केला आहे. राज्य जीएसटीची प्रतिपूर्ती आणि रॉयल्टीतील सवलतींना राज्य शासनाने मंजुरी दिल्याचेही अहवालात नमूद आहे.

आमदार लांडगे यांच्या 'व्हीजन-२०२०'मधील हा सुमारे २९.९२ किलोमीटरचा आठपदरी उन्नत मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० वर उभारला जाणार आहे. नऊ प्रमुख जंक्शन, दोन मोठे पूल, दोन्ही बाजूंना सेवा रस्ते आणि प्रवेश-निर्गमनासाठी रॅम्प यांचा प्रकल्पात समावेश आहे. या मार्गामुळे भोसरी-चाकण औद्योगिक पट्ट्यातील वाहतुकीचा ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. बांधकामपूर्व मंजुऱ्या आणि भूसंपादनासाठीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून, एनएचएआयने 'अपॉइंटेड डेट' अर्थात काम सुरू करण्याची अधिकृत तारीख जाहीर केल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होईल. त्या तारखेपासून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३६ महिन्यांची मुदत निश्चित करण्यात आली आहे.





"भोसरी-चाकण औद्योगिक पट्ट्यात रोज ये-जा करणाऱ्या कामगारांचा आणि प्रवाशांचा वाहतूक कोंडीत जाणारा वेळ वाचावा, यासाठी नाशिक फाटा-खेड आठपदरी उन्नत मार्गाचा आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने या प्रकल्पाला आर्थिक सहकार्य दिले. 'व्हीजन-२०२०'मधील या प्रकल्पासाठी आवश्यक संपूर्ण जमिनीचा कागदोपत्री ताबा एनएचएआयला मिळाला असून कंत्राट मंजुरीचे पत्रही जारी झाले आहे. आता काम सुरू करण्याची अधिकृत तारीख लवकर जाहीर व्हावी आणि त्या तारखेपासून ३६ महिन्यांच्या निर्धारित मुदतीत प्रकल्प पूर्ण व्हावा, यासाठी आमचा पाठपुरावा सुरू राहील."

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

मालपाणी बांधकाम व्यावसायिक पुणे महापालिकेचे जावई आहेत का?

■ पुणे (दै. संध्या)

बाणेर येथील मालपाणी बांधकाम प्रकल्पाला तब्बल ४ कोटी ३८ लाख ९१ हजार २०० रुपयांचा दंड थकीत असतानाही पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाने भोगवटा प्रमाणपत्र (OC) दिल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी केला आहे. पथ विभागाने दंडाची रक्कम भरल्याशिवाय कोणतीही परवानगी देऊ नये आणि काम थांबविण्याची नोटीस बजावावी, असे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही संबंधित प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र कसे देण्यात आले, असा सवाल काळे यांनी उपस्थित केला आहे.

बाणेर येथील मे. एम. रामानुसन मालपाणी यांच्या बांधकाम प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेची पूर्वपरवानगी न घेता डांबरी रस्त्याची खोदाई करण्यात आली होती. दोन टप्प्यांत प्रत्येकी ६०० रनिंग मीटरप्रमाणे एकूण १२०० रनिंग मीटर रस्त्याची विनापरवाना खोदाई झाल्याचे पथ विभागाच्या कारवाईत समोर आले. याप्रकरणी रयत स्वाभिमानी संघटनेने १८ मार्च २०२५ रोजी तक्रार केली होती. त्यानंतर रविराज काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महापालिकेच्या पथ विभागाने संबंधित बांधकाम व्यावसायिकाला दंड ठोठावला.

महापालिकेच्या धोरणानुसार प्रति रनिंग मीटर १२ हजार १९२ रुपये दराने तिप्पट दंड आकारण्यात आला. ६०० मीटर खोदाईसाठी २ कोटी १९ लाख ४५ हजार ६०० रुपयांचा दंड अशा दोन स्वतंत्र पत्रांद्वारे आकारण्यात आला. त्यामुळे १२०० मीटर विनापरवाना खोदाईचा एकूण दंड ४ कोटी ३८ लाख ९१ हजार २०० रुपये इतका झाला आहे. याशिवाय संबंधित बांधकाम व्यावसायिकाने आणखी १०० रनिंग मीटर रस्त्याची खोदाई केल्याप्रकरणी पथ विभागाने स्वतंत्र नोटीस बजावली आहे. या खोदाईसाठी सुमारे ३६ लाख ५७ हजार ६०० रुपयांचा तिप्पट दंड निश्चित करून वसूल करण्याची कारवाई अद्याप प्रलंबित असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, पथ विभागाने १६ मे २०२५ रोजी पत्राद्वारे बांधकाम विकास विभागाला (झोन क्रमांक ३) स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, दंडात्मक रक्कम भरल्याशिवाय संबंधित प्रकल्पाबाबत कोणतीही परवानगीविषयक कार्यवाही करू नये आणि प्रकल्पाला काम थांबविण्याची नोटीस बजावावी. मात्र, या आदेशांकडे दुर्लक्ष करून बांधकाम विकास विभागाने संबंधित प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

'मालपाणी महापालिकेचे जावई आहेत का?'

या प्रकरणावर संताप व्यक्त करताना रविराज काळे यांनी महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, "मालपाणी बांधकाम व्यावसायिकावर बांधकाम विभाग इतका मेहरबान का आहे? मालपाणी हे पुणे महानगरपालिकेचे जावई आहेत का? सर्वसामान्य पुणेकरांचा छोटासा दंड किंवा कर थकीत असल्यास त्यांना साधे कागदपत्र मिळवण्यासाठीही महापालिकेच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. मग एका बड्या बांधकाम व्यावसायिकाकडे ४ कोटी ३८ लाख रुपयांचा दंड थकीत असतानाही त्याला भोगवटा प्रमाणपत्र कोणत्या नियमांच्या आधारे आणि कोणाच्या आशीर्वादाने देण्यात आले?" या संपूर्ण प्रकरणामागे मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. महापालिकेच्या एका विभागाने दिलेल्या स्पष्ट आदेशांना दुसऱ्या विभागाने केराची टोपली दाखवणे ही गंभीर बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दंडवसुलीपासून अधिकाऱ्यांच्या निलंबनापर्यंत चार मागण्या

या प्रकरणी आम आदमी पार्टीच्या वतीने चार प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून १२०० मीटर खोदाईचा थकीत ४ कोटी ३८ लाख ९१ हजार २०० रुपयांचा दंड व्याजासह तातडीने वसूल करावा. दंड न भरता दिलेले भोगवटा प्रमाणपत्र नियमबाह्य असल्यास त्यावर तातडीने स्थगिती देऊन आवश्यक कायदेशीर कारवाई करावी. अतिरिक्त १०० मीटर रस्ता खोदाईच्या प्रकरणात तिप्पट दंड निश्चित करून त्याची वसुली करावी. तसेच पथ विभागाच्या आदेशांकडे दुर्लक्ष करून भोगवटा प्रमाणपत्र देण्यास जबाबदार असलेल्या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांचे निलंबन करून त्यांची उच्चस्तरीय विभागीय चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अन्यथा आम आदमी पार्टीच्या वतीने पुणे महानगरपालिका मुख्यालयावर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रविराज काळे यांनी दिला आहे. दंडाची कोट्यवधींची रक्कम थकीत असताना सर्वसामान्यांसाठी कठोर नियम आणि बड्या बांधकाम व्यावसायिकांसाठी वेगळे निकष आहेत का, हा प्रश्न आता या प्रकरणामुळे उपस्थित झाला आहे.

निष्ठा सिद्ध करण्यासाठी कोणाच्या प्रमाणपत्राची गरज नाही : शायना एनसी

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयीच्या वक्तव्यावरून निर्माण झालेल्या वादानंतर शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्यावरील प्रेम आणि निष्ठा सिद्ध करण्यासाठी आपल्याला कोणाच्याही प्रमाणपत्राची गरज नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. तसेच, आपल्या कृतीमुळे खऱ्या शिवसैनिकांच्या किंवा बाळासाहेबांच्या चाहत्यांच्या भावना अनावधानाने दुखावल्या गेल्या असतील, तर त्यांनी मनापासून माफीही मागितली आहे. शायना एनसी यांनी यासंदर्भात भूमिका मांडताना सांगितले की, बाळासाहेब ठाकरे हे त्यांच्या आयुष्यातील पितृतुल्य व्यक्तिमत्त्व होते. लहानपणीच त्यांची बाळासाहेबांशी भेट झाली होती. ते त्यांच्या वडिलांचे अत्यंत जवळचे मित्र होते. त्यांच्या कुटुंबाशी बाळासाहेबांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. अनेक वर्षे त्यांचा सहवास आणि आशीर्वाद लाभले. त्यांच्या लग्नालाही बाळासाहेब आवर्जून उपस्थित होते, अशी आठवण त्यांनी सांगितली. बाळासाहेब हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे अद्वितीय नेतृत्व होते. प्रखर देशभक्त, कट्टर हिंदुत्ववादी आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे निस्सीम चाहते असलेल्या बाळासाहेबांनी आपल्या हिंदुत्वाच्या विचारांशी कधीही तडजोड केली नाही.



तीन तिगाडा, तरुण प्रेम, भव्य स्वप्नं आणि अनपेक्षित वळणांची हृदयस्पर्शी कथा, आता स्ट्रीमिंग हिंदी Zee 5वर

■ मुंबई (दै. संध्या)

प्रेम, स्वप्नं आणि जीवन क्वचितच योजनेनुसार चालते. तारुण्यातील प्रणय, महत्त्वाकांक्षा आणि अनपेक्षित वळणे यांना एकत्र आणणारा 'तीन तिगाडा' आता हिंदी Zee 5 वर स्ट्रीम होत आहे. संगीत आणि क्रिकेटच्या जगावर आधारित, हे आगामी नाट्य दोन तरुण व्यक्तींचे प्रेम आणि त्यांच्या आकांक्षांवर आधारित आहे. जे केवळ त्यांच्या भविष्यासाठी त्यांनी कल्पना केलेल्या प्रत्येक गोष्टीला आव्हान देणाऱ्या जीवन बदलणाऱ्या परिस्थितीचा सामना करताना दिसतात. प्रसन्ना बिष्त, दानेश रजवी, अर्चना अरोरा, समर्थ मेहता आणि ग्रुशा कपूर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'तीन तिगाडा'ची निर्मिती स्ट्रीटलॅम्प मीडिया एंटरटेनमेंट एलएलपी आणि आय स्क्रीम ड्रीम्स मीडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी केली आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी आहेत प्रसन्ना बिष्त हिने साकारलेली आस्मानी आणि दानेश रझवी याने साकारलेला मनन. आपापल्या नात्याला आणि वैयक्तिक स्वप्नांना सांभाळत पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतानाच त्यांच्या आयुष्यात अनपेक्षित गर्भधारणेमुळे मोठे वळण येते.



गरजू कुटुंबांना मदतीचा हात; लांडगे यांच्या पुढाकारातून किटवाटप

खेड, जुन्नर आणि आंबेगावमधील ५१ आदिवासी गावांपर्यंत मदत पोहोचवण्याचे नियोजन



■ पिंपरी(दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील बोरघर कोकणेवाडी येथील गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. भाजपा इंद्रायणीनगर-भोसरीचे मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांनी गावाला भेट देऊन ही मदत कुटुंबांपर्यंत पोहोचवली. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत हे वाटप करण्यात आले. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून ती रक्कम गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वापरावी, या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता. उपक्रमांतर्गत खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल इतका किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन आहे. याच उपक्रमातून शिवराज लांडगे यांनी बोरघर कोकणेवाडीत प्रत्यक्ष जाऊन मदतीचे वाटप केले.

'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!'


"आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा खर्च गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वापरावा, या विचारातून 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत बोरघर कोकणेवाडीत प्रत्यक्ष जाऊन आम्ही गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंची किट दिली. या मदतीमुळे कुटुंबांच्या दैनंदिन खर्चाला काहीसा हातभार लागेल."

- शिवराज लांडगे, भाजपा इंद्रायणीनगर, भोसरी मंडलाध्यक्ष.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



१६ हजार महिलांना रोजगार प्रशिक्षण

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून महिलांना रोजगार प्रशिक्षण दिले जाणार आहे. वर्षभरात एकूण १६ हजार महिला व तरुणींना वेगवेगळ्या ५७ प्रकारचे प्रशिक्षण खासगी संस्थेमार्फत दिले जाणार आहे. त्यासाठी एकाला किमान ११ हजार २५ रुपये तर कमाल ३२ हजार ११९ रुपये शुल्क आहे. ते शुल्क महापालिका त्या संस्थेला देणार आहे. त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच, विविध कामांच्या खर्चाना स्थायी समितीने बुधवारी (दि. १८) झालेल्या सभेत मंजुरी दिली आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या वेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगर सचिव उल्हास जगताप, समितीचे सदस्य तसेच, विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते. समाज विकास विभागाकडून महिला सक्षमीकरण व सबलीकरण योजनेंतर्गत शहरातील महिला व मुलींना वस्तीपातळीवर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिले जाते. त्यासाठी ५७ विविध विषयांचे मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या खासगी संस्थेमार्फत एका वर्षाच्या कालावधीत दिले जाणार आहे. त्या खर्चास समितीने मान्यता दिली. यामध्ये अकाउंट्स, फॅशन डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, ब्युटी व वेलनेस, फूड प्रोसेसिंग, माहिती तंत्रज्ञान, डेटा ॲनालिसिस, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, केटरिंग तसेच पारंपरिक कला आणि सेवा क्षेत्रातील अभ्यासक्रमांचा समावेश आहे. शहरातील सर्व झोपडपट्ट्यांमध्ये सेवाशुल्क बिलांचे वाटप व नागरिकांची माहिती मोबाईल ॲपद्वारे अद्ययावत करण्याचे काम महिला बचतगटांमार्फत करण्यात येणार आहे. प्रत्येक बिलासाठी २५ रूपये शुल्क दिले जाणार आहे.

दिवाळीच्या सुटीत चोरट्यांचा धुमाकूळ; पिंपरी-चिंचवडमध्ये १९ दिवसांत ९७ चोऱ्या

पिंपरी : दैनिक संध्या

दिवाळीचा आनंद साजरा करण्यासाठी कामगार कुटुंबे गावी गेली आणि इकडे चोरट्यांनी बंद घरांवर डल्ला मारला. पिंपरी-चिंचवडमध्ये दिवाळीच्या सुट्टीचा चोरट्यांनी चांगलाच फायदा उठविला. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या सूचनेनुसार शहरात विशेष गस्त वाढविण्यात आली होती. मात्र, पोलिसांची नजर चुकवून चोरट्यांनी अनेक ठिकाणी हात साफ केला. १ नोव्हेंबरपासून अवघ्या १९ दिवसांत शहरात चोरीचे तब्बल ९७ गुन्हे दाखल झाले आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रोजगाराच्या शोधात आलेल्या कामगारांनी पिंपरी-चिंचवडमध्ये आपले बस्तान बसविले आहे. शहरातील मोठ्या कंपन्या, औद्योगिक वसाहती, लघुउद्योग आणि विविध व्यवसायांमध्ये हा कामगारवर्ग कार्यरत आहे. वर्षभर कामाच्या व्यापात असलेली ही कुटुंबे दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुटीत आपल्या मूळ गावी जातात. यंदाही दिवाळीनिमित्त मोठ्या प्रमाणावर नागरिक शहराबाहेर पडले होते. परिणामी, कामगार वस्त्या, चाळी आणि सोसायट्यांमधील अनेक घरांना कुलूप लागले होते. पोलिस दप्तरी नोंद झालेल्या ९७ गुन्ह्यांव्यतिरिक्त आणखी काही चोरीच्या घटना घडल्या असण्याची शक्यता आहे. काही कामगार कुटुंबे अद्याप मूळ गावी असल्याने त्यांच्या घरांची स्थिती स्पष्ट झालेली नाही. संबंधित नागरिक परतल्यानंतरच अशा घटनांची माहिती समोर येणार आहे.

पिंपरीत 'मिशन सुधार'चा धडाका; २,२०० शिधापत्रिकाधारकांची नावे कमी

पिंपरी : दैनिक संध्या

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अपात्र लाभार्थ्यांना वगळून पात्र आणि गरजू कुटुंबांपर्यंत स्वस्त धान्याचा लाभ पोहोचविण्यासाठी शासनाकडून 'मिशन सुधार' मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पिंपरी ज विभागात शिधापत्रिकाधारकांची पडताळणी करण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे २ हजार २०० लाभार्थ्यांची नावे कमी करण्यात आली आहेत. त्यामुळे पिंपरी विभागातील लाभार्थ्यांची संख्या पूर्वीच्या सुमारे १६ हजारांवरून आता १३ हजार ८०० वर आली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गैरप्रकार रोखणे, अपात्र व्यक्तींकडून घेतला जाणारा स्वस्त धान्याचा लाभ थांबविणे आणि खऱ्या गरजू लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजनेचा लाभ पोहोचविणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. त्यासाठी शिधापत्रिकाधारकांच्या पात्रतेची तपासणी केली जात असून, शासनाने निश्चित केलेल्या निकषांमध्ये न बसणाऱ्या लाभार्थ्यांची माहिती संकलित केली जात आहे. या पडताळणी प्रक्रियेत कुटुंबाचे उत्पन्न, आयकर भरण्याची स्थिती, शासकीय किंवा निमशासकीय सेवेत असलेल्या सदस्यांची माहिती तसेच शिधापत्रिकेवरील नोंदींची तपासणी केली जात आहे. उपलब्ध शासकीय माहिती आणि संबंधित नोंदींच्या आधारे संशयित अपात्र लाभार्थ्यांची यादी तयार केली जाते. त्यानंतर संबंधित यादी स्वस्त धान्य दुकानदारांकडे पडताळणीसाठी पाठविली जाते. प्रत्यक्ष कागदपत्रे आणि वस्तुस्थिती तपासल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाते. दरम्यान, काही लाभार्थ्यांच्या उत्पन्नाबाबत तसेच पात्रतेच्या निकषांबाबत शंका उपस्थित झाल्याने त्यांची स्वतंत्रपणे छाननी केली जात आहे. केवळ प्राथमिक यादीत नाव आल्याने संबंधित लाभार्थी अपात्र ठरत नाही. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची तपासणी आणि संबंधित विभागाची पडताळणी महत्त्वाची आहे. त्यामुळे या प्रक्रियेत पात्र लाभार्थ्यांवर अन्याय होऊ नये, याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये मातांना पौष्टिक खाऊ, नवजात मुलींना बाळंतविडा

पिंपरी : दैनिक संध्या

प्रशासकीय राजवटीत महापालिका कर्जबाजारी झाल्यामुळे सध्या प्रभागातील कामांसाठी निधी नाही, असे सांगितले जात आहे. असे असताना समाज विकास विभागाने शहरातील ३६ हजार मातांना पौष्टिक खाऊ व १७ हजार नवजात मुलींना बाळंतविडा देण्याची नवीन योजना आणली आहे. राज्य शासनाची अशीच योजना असताना पुन्हा एका वर्षासाठी २५ कोटी असे तीन वर्षांसाठी तब्बल ७५ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. शासनामार्फत सर्वत्र डीबीटीचे (थेट लाभ बँकेत हस्तांतरण) धोरण राबवत असताना ठेकेदार पोसण्यासाठी असा खर्चिक योजनाचा घाट घातला जात असल्याच आरोप होत आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये नोंदणी झालेल्या तसेच, शहरात वास्तव्यास असलेल्या प्रसूत मातांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. प्रसूतीनंतर मातांना पौष्टिक आहार उपलब्ध व्हावा, तसेच नवजात बालिकांना आवश्यक कपडे आणि प्रसाधन साहित्य मिळावे, हा या योजनेचा उद्देश आहे. अंगणवाडी सेविकेच्या माध्यमातून प्रसूतीपूर्वी मातांना खुराक, नवजात बालकांना कीट दिले जाते, अशी योजना राज्य शासनाच्या माध्यमातून सुरू आहे. नवीन योजनेवर कोट्यवधी रुपये करण्याचा वेगळा अट्टहास का?, हा प्रश्न उपस्थित होत आहे. राज्य शासनाच्या अनेक योजनांचा फायदा डीबीटीच्या माध्यमातून दिला जातो. मात्र, महापालिकेत ठेकेदार पोसण्यासाठी असे धोरण राबवले जात असल्याचा आरोप केला जात आहे. त्यासाठी नुकतीच ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२४ व २५ नोव्हेंबरला दोन दिवसीय 'कऱ्हा नदी परिक्रमा'

काठावरील ग्रामस्थांनी परीक्रमेचे स्वागत करण्याचे माजी आमदार संजय जगताप यांचे आवाहन

■ सासवड : (दै. संध्या)

पुरंदर आणि बारामती तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या कऱ्हा नदीच्या संवर्धनाचा संदेश देण्यासाठी तसेच नदीकाठचा समृद्ध इतिहास, संस्कृती आणि भक्तीचा वारसा जपण्यासाठी येत्या २४ व २५ नोव्हेंबर रोजी दोन दिवसीय 'कऱ्हा नदी परिक्रमे'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. पुणे येथील दख्खन पठार वन्यजीव संवर्धन संस्थेच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम राबविला जात असून, परिक्रमेच्या मार्गावरील सर्व गावकऱ्यांनी परिक्रमाकर्त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करत या अभियानाला बळ द्यावे, असे आवाहन माजी आमदार संजय जगताप यांच्यासह संयोजकांनी केले आहे.

या उपक्रमाच्या पूर्वतयारीसाठी गुरुवारी (ता. १९) सासवड येथील ऐतिहासिक कऱ्हाबाई मंदिरात संयोजक व प्रमुख कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी माजी आमदार संजय जगताप, विजय कडू, विराज फरांदे, दीपक जांभळे आदी मान्यवर उपस्थित होते.

येत्या २४ नोव्हेंबर रोजी पहाटे कऱ्हा नदीचे उगमस्थान असलेल्या गराडे येथील चतुर्मुख महादेव मंदिरातून या परिक्रमेचा श्रीगणेशा होईल. दोन दिवसांच्या या प्रवासात गराडे, कोडीत, सासवड, पांडेश्वर, आंबी खुर्द, जळगाव सुपे, सोनगाव आणि बारामती या भागातील नदीकाठच्या दहाहून अधिक प्राचीन आणि ऐतिहासिक शिवमंदिरांचे दर्शन घेतले जाणार आहे. यामध्ये पंचमुखी, कोटेश्वर, संगमेश्वर, पांडवेश्वर, रामेश्वर, सोनेश्वर, जवळेश्वर, काशी विश्वेश्वर, ऋणमोचणेश्वर, चांगावटेश्वर आणि सिद्धेश्वर या मंदिरांचा समावेश आहे. या भेटीदरम्यान परिक्रमाकर्ते केवळ दर्शनच घेणार नाहीत, तर या मंदिरांची स्थापत्यकला, इतिहास आणि धार्मिक महात्म्यही जाणून घेणार आहेत. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पुन्हा गराडे येथील चतुर्मुख महादेव मंदिरात या परिक्रमेची सांगता होईल.



या परिक्रमेत तीनशेहून अधिक नागरिक सहभागी होणार आहेत. कऱ्हा नदी स्वच्छ आणि प्रवाही राहण्यासाठी जनजागृती करण्याचा यामागचा मुख्य उद्देश असून, त्या-त्या गावातील ग्रामस्थांनी परिक्रमाकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन संजय जगताप, विजय कडू, विराज फरांदे व दीपक जांभळे यांनी केले आहे. दरम्यान, या परिक्रमेत सहभागी होण्यासाठी येत्या २१ नोव्हेंबरपर्यंत नावनोंदणी करणे अनिवार्य असल्याचे संयोजकांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

या आढावा बैठकीस विनोद कबनूरकर, रवींद्रपंत जगताप, बाजीराव जगताप, संजय जगताप, संजय काटकर, नगरसेवक प्रदीप राऊत, हेमंत ताकवले, अमित पवार, संभाजी भगत, अजय जगताप, आकाश दळवी यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महापालिका १,२४६ कोटींचे कर्ज उभारणार

■ पिंपरी(दै. संध्या)

उद्योगनगरीत अत्यावश्यक असलेली विकासकामे पूर्ण करण्यासाठी श्रीमंत असा नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून कर्ज काढण्यात येत आहे. पवना बंदिस्त जलवाहिनी आणि ड्रेनेजलाईन प्रकल्पांसाठी एकूण १ हजार २४६ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज घेण्यास अखेर स्थायी समितीने बुधवारच्या (दि. १८) सभेत ग्रीन सिग्नल दिला आहे. येत्या शुक्रवारी (दि. २०) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत त्यावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात येणार आहे.

मोशी रुग्णालयास ५०० कोटी रुपयांचे कर्ज न घेता ते पीपीपी तत्त्वावर उभारून चालवले जाणार आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. शहरासाठी आवश्यक असलेली मात्र, खर्चिक प्रकल्प निधीअभावी अडकून पडले आहेत. वाढत्या लोकसंख्येसाठी अत्यावश्यक असलेला पवना बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. शहरातील जुनी ड्रेनेजलाईन काढून नव्याने व अधिक क्षमतेची टाकण्याचा मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. मोशी रुग्णालयाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे.

हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कर्ज घेण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या मुख्य लेखा व वित्त विभागाने स्थायी समितीसमोर ठेवला होता. पवना जलवाहिनी प्रकल्प, शहरात ड्रेनेजलाईन नव्याने टाकणे, नव्याने मैलासांडपाणी प्रकल्प उभारणे, पाण्याची गळती कमी करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर प्रकल्प, वेस्ट टू एनर्जी टप्पा दोन, मोशी रुग्णालय या प्रकल्पांसाठी तब्बल ५ हजार ७९७ कोटी रुपयांची गरज आहे.

लोहकरवाडीतील गरजू कुटुंबांसाठी नगरसेविका अर्चना करांडे यांचा पुढाकार!

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील लोहकरवाडी येथील गरजू कुटुंबांना मदत पोहोचवण्यासाठी प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका सौ. अर्चना अक्षय करांडे यांनी पुढाकार घेतला आहे. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा पिंपरी-चिंचवडच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत त्यांनी लोहकरवाडीसाठी सहभाग घेतला आहे.

वाढदिवसानिमित्त हार-तुरे, पुष्पगुच्छ आणि होर्डिंग्जवर होणारा खर्च गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी वळवावा, असे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यातील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांपर्यंत मदत



पोहोचवण्याचे उद्दिष्ट आयोजकांनी ठेवले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील लोकप्रतिनिधींनाही ग्रामीण भागातील कुटुंबांच्या मदतीसाठी सहभागी करून घेण्यात आले आहे.या जिल्हास्तरीय उपक्रमात प्रभाग क्रमांक १३ मधून सहभागी होत करांडे यांनी जुन्नर तालुक्यातील लोहकरवाडीवर लक्ष केंद्रित केले आहे. लोहकरवाडीतील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचवण्यावर त्यांच्या सहभागाचा भर आहे.आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमात सहभागी होताना आम्ही जुन्नर तालुक्यातील लोहकरवाडीची निवड केली. गावातील गरजू कुटुंबांच्या गरजा समजून घेऊन त्यांच्यापर्यंत मदत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. लोकप्रतिनिधी म्हणून गरजेच्या वेळी कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे, ही आमची जबाबदारी आहे, असे अर्चना करांडे, नगरसेविका तथा अध्यक्षा, अ-प्रभाग, पिंपरी-चिंचवड यांनी सांगितले.

औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडची आता जागतिक क्रीडा नकाशावरही छाप

१० जानेवारी २०२७ रोजी 'पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन'चे आयोजन

■ पिंपरी(दै. संध्या)

औद्योगिक नगरी म्हणून देशभरात ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला आता क्रीडा क्षेत्रातही जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने येत्या १० जानेवारी २०२७ रोजी 'पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात येणार आहे. या मॅरेथॉनमध्ये ४२ किलोमीटर फुल मॅरेथॉन, २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन, १० किलोमीटर आणि ५ किलोमीटर अशा विविध गटांचा समावेश असणार आहे. नागरिकांमध्ये आरोग्य आणि फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धावपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

मॅरेथॉनच्या आयोजनासाठी अशा स्पर्धांचा अनुभव असलेल्या संस्थेची मदत घेतली जाणार असून, स्पर्धेची नोंदणी आणि अन्य व्यवस्थापन आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात येणार आहे. तसेच 'पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन'चा समावेश जागतिक मॅरेथॉन कॅलेंडरमध्ये व्हावा, यासाठीही विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

महापौर रवि लांडगे म्हणाले, "पिंपरी-चिंचवड शहराची ओळख आजवर औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीमुळे देशभरात निर्माण झाली आहे. आता क्रीडा क्षेत्रातही शहराला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉनच्या माध्यमातून शहरातील तरुणाई आणि नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीची प्रेरणा मिळेल. देश-विदेशातील धावपटूंना आकर्षित करणारी ही स्पर्धा शहराच्या लौकिकात भर घालणारी ठरेल. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा." "पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉनचे आयोजन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियोजनानुसार करण्यात येणार आहे. ४२, २१, १० आणि ५ किलोमीटर अशा विविध गटांमुळे सर्व वयोगटांतील धावपटूंना सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचा जागतिक मॅरेथॉन कॅलेंडरमध्ये समावेश व्हावा, यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातील. शहरात क्रीडा संस्कृती रुजविणे, नागरिकांचे आरोग्य उत्तम राखणे आणि पिंपरी-चिंचवडला आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात ओळख मिळवून देणे हा या



आयोजनामागील मुख्य उद्देश आहे." असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले.

या कार्यक्रमाचे अनुषंगाने महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांची पत्रकार परिषद आज घेण्यात आली होती,या परिषदेस उपमहापौर शर्मिला बाबर,विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,क्रीडा समिती सभापती कैलास कुटे,क्रिडा समिती सदस्य योगेश लांडगे,धर्मपाल तंतरपाळे,शाम जगताप,तानाजी बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम,उप आयुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

मॅरेथॉनचा मार्ग : डी. वाय. पाटील मैदान - धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक - भक्ती-शक्ती चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक - टेल्को रोड - इंद्रायणीनगर - एम्पायर इस्टेट ब्रिज - काळेवाडी चौक - डांगे चौक - संत तुकाराम ब्रिज - रावेत - कॅन्टोन्मेंट - डी. वाय. पाटील मैदान.

मॅरेथॉनसाठी इच्छुक धावपटूंना indiarunning.com या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला या मॅरेथॉनमुळे नवी दिशा मिळणार असल्याचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.

कऱ्हा परिक्रमेच्या मार्गांवरील गावच्या नागरिकांनी स्वागत करावे

■ जेजुरी (दै. संध्या)

नदी संवर्धन, भक्ती, संस्कृती, इतिहास या सर्व बाबींना स्पर्श करणाऱ्या दिनांक 24 व 25 रोजी दोन दिवसीय कऱ्हा नदीच्या परीक्रमेच्या निमित्ताने नदी तीरावरील सर्वच गावाकऱ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन या उपक्रमाच्या संयोजकांनी केले आहे.

दख्खन पठार वन्यजीव संवर्धन संस्था पुणे यांच्या विशेष पुढाकारातून येत्या २४ व २५ नोव्हेंबर रोजी ही परिक्रमा नऊ गावातून दहाहून अधिक शिव मंदिरांना भेट देऊन तेथील,इतिहास, मंदिर रचना, महात्म्य याविषयी माहिती घेणार आहेत. दिनांक १९ नोव्हेंबर गुरुवारी सासवड येथील कऱ्हाबाई मंदिरात याबाबत संयोजकांनी एका आढावा बैठकीचे आयोजन केले होते. पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांसह विजय कडू, विराज फरांदे पिक जांभळे व अन्य मंडळी यावेळी उपस्थित होती . २४ नोव्हेंबरला सकाळी गराडे येथील कऱ्हेच्या उगम स्थानापासून परीक्रमा सुरु होऊन पुरंदर तालुक्यातील गराडे, कोडीत, सासवड पांडेश्वर, ते बारामती तालुक्यातील आंबी खुर्द, जळगाव सुपे, सोनगाव, बारामती या गावातील शिवालयात भेटी देत २५ रोजी पुन्हा चतुर्मुख या उगम स्थानी सायंकाळी पोहचून तेथे सांगता होणार आहे. या परिक्रमेत पंचमुखी, कोटेश्वर, संगमेश्वर, पांडवेश्वर, रामेश्वर, सोनेश्वर जवळेश्वर, काशी विश्वेश्वर, चांगा वटेश्वर, सिद्धेश्वर मंदिर असा हा प्रवास असुन त्या त्या गावच्या नागरिकांनी यात सहभागी होऊन परीक्रमां करणाऱ्या सुमारे तीनशेपेक्षा जास्त सहभागींना पाठबळ व उपक्रमास शुभेच्छा द्याव्यात असे आवाहन संजय जगताप, कडू, फरांदे, जांभळे आदींनी केले आहे. परीक्रमेत



सहभागी होण्यासाठी २१ नोव्हेंबर पर्यंत नोंदणी करणे आवश्यक असल्याची माहितीही या आढावा बैठकीत देण्यात आली. बैठकीस विनोद कबनूरकर, रविंद्र जगताप, बाजीराव जगताप,संजय काटकर, माऊली यादव,बंडु राऊत, हेमंत ताकवले,अमित पवार, संभाजी भगत, अजय जगताप आकाश दळवी यांसह अनेक मंडळी उपस्थित होती.